मुंबई बाजार
73,738.45
(+0.12)
राष्ट्रीय बाजार
22,368 | +0.14
सोने (२२ कॅरेट)
66,150/-
चांदी (किलो)
83,000/-

आवाज आपल्या मनातला...

# लोकआवाज

इंटरनेट आवृत्ती : गुगलवर पाहा elokawaj




अहमदनगर । बुधवार दि. २४ एप्रिल २०२४ ■ किंमत : ३ रुपये ■ वर्ष : १६ ■ अंक : १६५ ■ पाने : ६

## संक्षिप्त...

### गावठीकट्टा विक्रीसाठी आलेल्या तरुणाला पकडले

अहमदनगर : गावठी कट्टा विक्रीसाठी आलेल्या तरुणाला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले आहे. त्याच्या ताब्यातून गावठी कट्ट्यासह १ जिवंत काडतूस हस्तगत करण्यात आले आहे. नगर पुणे रोडवरील बेलवंडी फाटा येथे ही कारवाई करण्यात आली आहे. विकास रमेश पठारे (वय ३०, रा. मावळेवाडी, ता. पारनेर) असे आरोपीचे नाव आहे. आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक दिनेश आहेर यांना नगर जिल्ह्यात अवैध हत्यारे बाळगणारे इसमांची माहिती काढुन कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार आहेर यांनी स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस अंमलदार संतोष लोढे, रवींद्र कर्डीले, रवींद्र घुंगासे, सागर ससाणे, मच्छिंद्र बर्डे, अमोल कोतकर, संतोष खैरे यांचे पथक तयार करुन अवैध अग्निशस्त्रे व हत्यारे बाळगणारे इसमांची माहिती काढून ही कारवाई केली.

### सरपंचासह तिघाजणांविरुद्ध गुन्हा

अहमदनगर : नवनागापूर शिवारात ओपन स्पेसमधील शनीमारूतीचा चौथरा जेसीबीच्या सहाय्याने पाडून टाकल्याप्रकरणी नवनागापूरचे सरपंच डॉ. बबन डोंगरे, अनिल डोंगरे व जेसीबीचा चालक अशा तिघा जणांविरोधात एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## वात्रटायन

### शिंदेंचा निर्धार पक्का; 'उबाठा'ला पुन्हा धक्का!

'उबाठा'ला धक्याची संधी,
शिंदे सेना सोडत नाही,
गरीब, बिचाऱ्या 'कॅटेगरी'त
अजिबात मोडत नाही..
तोंडी बाळासाहेबांचं
गौरवगीत,
कमळाचं फूल हातात,
गडबड नाही, बडबड नाही,
मुंगी होऊन साखर खातात
'उबाठा'चा नेता फुटला,
बातमी कानावर कोसळते,
त्यांना सोयर सुतक नसते,
शिवसैनिकांचे रक्त उसळते
शिदेंना जुगाड जमलाय,
'नमो नमो' मैफलीत रमलाय,
'मातोश्री'वरला कार्यकर्ता,
शिव्या घा-घालून दमलाय..
या वेळी 'उबाठा' सेनेचा
सुफडा नक्की साफ होईल,
शिदे सेनेचे शंभर गुन्हे,
'भाजपा' कोर्टात माफ होईल..
'उबाठा' संपवायचा निर्धार,
सगळ्यांनी पक्का केला,
नार्वेकरांचा मिलिंद भेटला,
जाता जाता धक्का दिला !

- संजीव शाळगावकर, पुणे

# मतदानासाठी खासगी कामगारांना पगारी सुट्टी

## सुट्टी शक्य नसल्यास तीन तासांच्या सवलतीची ताकीद

■ **सहाय्यक कामगार आयुक्तांचे आदेश**

अहमदनगर : लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी अहमदनगर व शिर्डी लोकसभा मतदारसंघात १३ मे रोजी मतदान होणार आहे. निवडणुकीच्या दिवशी कामगारांना त्यांच्या मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्याची सुचना शासनातर्फे करण्यात आली आहे.



शासनाच्या सुचनेनुसार कामगारांना मतदानासाठी भरपगारी सुट्टी देण्याचे निर्देश सहायक कामगार आयुक्तांनी आज दिले.

### 'त्यांच्या'वर प्रस्तावित होईल कारवाई..!

कोणत्याही परिस्थितीत मतदारांना मतदानासाठी किमान दोन ते तीन तासांची सवलत मिळेल, याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहिल. या सूचनांचे योग्य ते अनुपालन होईल, याची खबरदारी घ्यावी. मतदारांना मतदानाकरिता योग्य ती सुट्टी अथवा वेळेची सवलत प्राप्त न झाल्याने मतदान करता येणे शक्य न झाल्यास आणि तशी तक्रार आल्यास संबंधिताविरुद्ध कारवाई प्रस्तावित करण्यात येईल, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

शासनच्या उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाकडील ५ एप्रिल २०२४ च्या परिपत्रकानुसार हे आदेश देण्यात (पान ४ वर)

### माय-लेकराचा वीज पडून मृत्यू

श्रीगोंदा : पावसाचे वातावरण झाल्याने कांदा झाकण्यासाठी धावपळ करणाऱ्या माय-लेकरांचा काल (दि. २२) वीज पडून दुर्दैवी मृत्यू झाला. येवती (ता. श्रीगोंदा) येथे ही घटना घडली. नवनाथ बाजीराव आढाव (वय २४) व मिनाबाई बाजीराव आढाव (वय ५०, दोघे रा. येवती, ता. श्रीगोंदा) अशी या वीज अपघातात मयत झालेल्या माय-लेकरांची नावे आहेत. सोमवारी ढगाळ वातावरण तयार झाल्यामुळे कांद्याचे नुकसान होऊ नये, या आशेपोटी दोघे मायलेक शेतातील कांदा झाकण्यासाठी आपल्या शेतात पोहोचले होते. सायंकाळच्या सुमारास कांदा झाकण्याचे काम सुरू असतानाच वीज कोसळून आई आणि मुलाचा त्यात होरपळून मृत्यू झाला. दोघांवरही अत्यंत शोकाकूल वातावरणामध्ये येवती येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. श्रीगोंदा पोलिस ठाण्यात याप्रकरणी आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# विजेचा शॉक बसल्याने घोडेगावात महिला ठार

घोडेगाव : घोडेगाव (ता. नेवासे) येथील गावातून जुना चांदा रस्त्यावर चेमटे गल्लीत विजेच्या खांबाला हाता स्पर्श होताच वीजेचा शॉक बसल्याने एक महिला जागीच गतप्राण झाली सोमवारी (ता. २२) दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली.

जयश्री सोमनाथ चेमटे, असे या अपघातात मयत झालेल्या महिलेचे नाव आहे. तिच्या मागे एक दोन वर्षांची मुलगी आहे. पती सोमनाथ वडापावच्या गाडीवर काम करतात. जयश्री हिच्या मृतदेहावर मंगळवारी दुपारी दीड वाजता येथील अमरधाममधे अंत्यसंस्कार करण्यात आले. घोडेगाव येथे वीज वितरण कंपनीचे उपविभागीय कार्यालय सहशाखा कार्यालय आहे. नागरिकांच्या सोयीसाठी कार्यालय असले तरी अडवणूकच जास्त होत असल्याच्या तक्रारी आहेत. गावात वीजवाहक तारा ऐवजी केबल टाकण्यासाठी मंजुरी आहे. परंतु अद्याप काम पुर्ण झाले नाही. गावात अनेक ठिकाणी तारा अगदी आठ दहा फुटांवर खाली लोंबकळताना दिसत आहेत. नागरिकांनी अनेक ठिकाणी सुरक्षीततेसाठी तारा वर पी व्हि सी पाईप टाकले आहेत. केबल टाकली असती तर खांबात वीजप्रवाह उतरला नसता आणि महिलेचा बळी गेला नसता, अशा प्रतिक्रीया आता उमटत आहेत. त्यामुळे वीज महावितरण कंपनीच्या

अधिकाऱ्यांमुळेच मुळेच महिलेचा बळी गेला असल्याची ग्रामस्थांची भावना असून, त्यामुळे गावातून संताप व्यक्त होत आहे. यातील दोषी अधिकारी-कर्मचाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



अहमदनगर : महाविकास आघाडीचे अहमदनगर लोकसभा मतदारसंघातील उमेदवार नीलेश लंके यांनी आज आपली उमेदवारी दाखल केली. समवेत राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष जयंत वाघ, शिवसेना जिल्हाप्रमुख (दक्षिण) प्रा. शशिकांत गाडे आदी. (छायाचित्र : राजू खरपुडे)

# कर्जतला खून करुन मृतदेह जामखेडला पुरला

नासीर पठाण

जामखेड : कर्जत शहरातील राजीव गांधी नगर परिसरात राहत असणारा महेश उर्फ दहीशा नर्गीशा काळे (वय ३०) या तरूणाचा काठीने व विटाने मारहाण करून खून केला आणि पुरावा नष्ट करण्यासाठी त्याचा मृतदेह जामखेड तालुक्यातील जवळा येथे दगडाखाली पुरला. अवघ्या २४ तासांत या घटनाक्रमाचा छडा लावण्यात पोलिस यंत्रणेला यश आले आहे.

कर्जत पोलिसांनी या प्रकरणी दोन आरोपींना २४ तासांत अटक केली. त्यातील तिसरा आरोपी पसार झाला आहे. त्याबाबत नितीन नर्गिशा काळे (वय ४०, रा. कर्जत) यांनी फिर्याद दिली आहे. १८ एप्रिल रोजी पहाटे चार




वाजण्याच्या दरम्यान तुषार उर्फ तलाश शिवा काळे, अश्विनी शिवा काळे व गौरी तुषार काळे (सर्व रा. राजीव गांधीनगर झोपडपट्टी, कर्जत) यांनी फिर्यादीचा भाऊ महेश याचे मोटरसायकलवर अपहरण केल्याची तक्रार दिली होती.

दरम्यान या गुन्ह्यातील आरोपी तुषार काळे यास पोलिसांनी अटक केली. व त्याच्याकडून सखोल चौकशी केली असता त्याने आपण महेश नर्गिशा काळे यास मारहाण करून त्याचा खून केला आहे आसे सांगितले व प्रेत पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने जामखेड तालुक्यातील जवळा येथे दगडाच्या ढिगाऱ्याखाली मृतदेह पुरून ठेवला आहे, अशी कबुली पोलिसांकडे दिली.

त्यानंतर कर्जत पोलीस आरोपीला घेऊन जवळा येथे गेले. त्या वेळी पोलीस निरीक्षक मारुती मुळक, जामखेड येथील तहसीलदार गणेश माळी, व काही पंचांच्या समक्ष आरोपीने मृतदेह ज्या ठिकाणी पूरून ठेवला आहे ते ठिकाण दाखवले. १९ एप्रिल रोजी पुरलेला मृतदेह बाहेर काढून कर्जत उपजिल्हा रुग्णालयामध्ये नेण्यात आला. (पान ४ वर)

# प्रचार साहित्यावर मुद्रक अन् प्रकाशकाचे नाव बंधनकारक

## अप्पर जिल्हाधिकारी कोळेकर यांचे स्पष्ट निर्देश

संगमनेर : शिर्डी लोकसभा मतदारसंघात सार्वत्रिक निवडणुकीची आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. या निवडणूक आदर्श आचारसंहिता काळात संबंधित मुद्रक, प्रिंटर्सनी प्रचार साहित्य तसेच इतर छपाई बाबत विशेष काळजी घेऊन आचारसंहितेचे पालन करावे. प्रचार साहित्यावर मुद्रक व प्रकाशकांचे नाव छापणे बंधनकारक असल्याचे अपर जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी बाळासाहेब कोळेकर यांनी सांगितले.

लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ च्या 'कलम १२७ 'अ'द्वारे निवडणूक पत्रकांच्या छपाईवर आणि प्रसिद्धीवर निर्बंध घालण्यात आले आहेत. त्याकडे सर्व राजकीय पक्ष, निवडणूक लढविणारे उमेदवार आणि मुद्रणालयांच्या चालक व मालकांचे लक्ष वेधण्यात आले आहे. हाताने नक्कल काढण्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रक्रियेने छापण्यात किंवा अनेक प्रती काढण्यात आलेले निवडणुकीसंबंधीचे प्रत्येक पत्र, हस्तपत्रक, घोषणाफलक किंवा भित्तीपत्रक यांच्या दर्शनी भागावर मुद्रकांचे आणि प्रकाशकाचे नाव व पत्ता प्रसिध्द करणे बंधनकारक आहे. (पान ४ वर)

### ..तर सहा महिन्यांचा कारावास होईल...!

लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ च्या कलम १२७ 'ए'मधील तरतूदीं भंग केल्यास मुद्रक किंवा प्रकाशकास सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा दोन हजार रुपयापर्यत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा या दोन्ही शिक्षा होऊ शकते. कोणतीही व्यक्ती मुद्रक किंवा प्रकाशक यांना धर्म, पंथ, जात, समाज किंवा भाषा यामध्ये तेढ निर्माण करणारे अथवा विरोधकाचे चारित्र्यहरण करणारे निवडणूक विषयक मजकूर व साहित्य प्रकाशित करता येणार नाहीत.

### थकीत कर्जदार दोन महिन्यांसाठी तुरुंगात

अहमदनगर : थकीत कर्जाची रक्कम फेडण्यासाठी दिलेला धनादेश न वटल्या प्रकरणी थकबाकीदार कर्जदारास दोन महिन्यांचा कारावास आणि दोन लाख रुपयांचा दंड करण्यात आला आहे. अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी ए. ए. जी. एम शेख यांच्या न्यायालयाने हा निकाल दिला.

गणी अब्दुल शेख असे, या थकबाकीदार कर्जदाराचे नाव आहे. त्याने राणी लक्ष्मी महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था (अकोळनेर, ता. नगर) या संस्थेकडून घरदुरुस्तीसाठी २२ ऑगस्ट २०१९ रोजी घरदुरुस्तीसाठी एक लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. त्या कर्जाचे थकबाकी रकमेपोटी आरोपी त्याने एचडीएफसी बँक (शाखा- अहमदनगर) या बँकेचा ११ ऑगस्ट २०२१ रोजी रोजीचा रक्कम रुपये एक लाख २३ हजार ७४६ रुपयांचा (पान ४ वर)

# बारामतीत सुप्रिया सुळे यांच्या विरोधातही 'तुतारी'च!

## विरोधी उमेदवाराचे चिन्ह बदलण्याची मागणी

■ **निवडणूक आयोगाकडे रिसतर तक्रार अर्ज ;**

पुणे : बारामतीत विद्यमान खा. सुप्रिया सुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्यावतीने पुन्हा निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्या 'तुतारी' या चिन्हावर लढत आहेत. मात्र, याच बारामती लोकसभा मतदारसंघातून सोहेल शेख नावाच्या व्यक्तीनेही उमेदवारी अर्ज भरला असून त्यांना 'तुतारी' नावाचे चिन्ह देण्यात आल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. त्यास आता खा. सुप्रिया सुळे यांच्यावतीने आक्षेप घेण्यात आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला निवडणूक आयोगाने तुतारी चिन्ह दिलेले आहे. त्यानुसार लोकसभा निवडणुकीला शरद पवारांचा पक्ष तुतारी फुंकण्याच्या तयारीत असताना अशा खोड्या सुरु झाल्याने पक्षाने नेते अस्वस्थ आहेत.

दरम्यान, नावात साम्य असलं, तरी चिन्हाचं स्वरुप वेगळं आहे. परंतु इंग्रजीत 'ट्रम्पेट' नाव असल्याने सुप्रिया सुळे यांच्या कायदेशीर सल्लागार टीमच्या वतीने हरकत घेण्यात आली आहे. सुप्रिया सुळे यांच्यावतीने हरकत घेण्यात आली आहे. सुळे यांचे निवडणूक प्रतिनिधी लक्ष्मीकांत खाबिया यांनी संदर्भात पत्रव्यवहार केला आहे. बारामती लोकसभा मतदारसंघात उमेदवारांच्या चिन्ह वाटपाबाबत झालेल्या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकरिता राखीव असलेले चिन्ह (तुतारी फुंकणार माणूस) याचे वाटप आम्हास केले. परंतु अपक्ष उमेदवार सोयल शहा युनूस शहा शेख यांना अपक्ष उमेदवार करिता चिन्ह तुतारी (ट्रम्पेट) असे वाटप केले आहे. त्यास आमची हरकत असल्याचे पत्रात म्हटले आहे. दोन्ही चिन्हाचे नावामधे साधर्म्य असल्याने चिन्ह तुतारी फुंकणार माणूस व तुतारी हे नाव सारखे आहे. राज्यपक्ष म्हणून आम्हास वाटप केलेले चिन्ह (तुतारी फुंकणार माणूस) ह्या नावात तुतारी या नावात साम्य असल्याने मतदार यांचा गोंधळ होऊ शकतो. (पान ४ वर)

# कत्तलीसाठी चालविलेल्या जनावरांचा टेम्पो पकडला

अहमदनगर : कत्तलीसाठी छत्रपती संभाजीनगरकडे घेवून चाललेल्या गोवंशीय जनावरांचा टेम्पो स्थानिक गुन्हे शाखेने पकडला. या टेम्पोसोबत असलेल्या कारमधून सहाशे किलो गोमांसही पकडण्यात आले. नगर तालुक्यातील जेऊर गावच्या शिवारात कोल्हुबाईचे कोल्हार गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर मंगळवारी (ता. २३) सकाळी ही कारवाई करण्यात आली.

दोन्ही वाहने व इतर मुद्देमाल मिळून १२ लाख रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक



गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक दिनेश आहेर यांनी गोवंशीय जनावरांची कत्तल करुन गोमांस वाहतुक व विक्री करणाऱ्यांवर कारवाईसाठी स्थानिक गुन्हे शाखेतील उपनिरीक्षक तुषार धाकराव व अंमलदार संदीप पवार, सचिन अडबल, संतोष लोढे, रोहित मिसाळ, शिवाजी ढाकणे, रणजित जाधव, भाऊसाहेब काळे व संभाजी कोतकर अशांचे पथक नेमलेले आहे.

पथकास सलमान शेख हा १ पांढरे रंगाचे (पान ४ वर)

# नेवासा बुद्रुकच्या दक्षिणमुखी मारुती मंदिरात पुष्पवृष्टी

## देवस्थानचे अध्यक्ष शिंदे व विश्वस्त ॲड. नवले यांच्याहस्ते अभिषेक

नेवासा फाटा : संत श्री समर्थ रामदास स्वामींनी १६६९ साली स्थापित केलेल्या दक्षिणमुखी मारुती मंदिरात हनुमंतरायांचा जन्मोत्सव पुष्पवृष्टी करून व फटाक्यांची आतषबाजी करून साजरा करण्यात आला. यावेळी राम लक्ष्मण...जानकी जय बोला हनुमान की.. या जयघोषाने परिसर दुमदुमला होता.

दक्षिणमुखी मारुती मंदिर देवस्थानच्या वतीने हनुमान जन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. हनुमान जयंतीच्या निमित्ताने पहाटेच्या (पान ४ वर)



### मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई..!

मंदिरावर केलेली विद्युत रोषणाई सर्व भाविकांचे आकर्षण ठरले होते. श्री समर्थ रामदास स्वामींनी महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी जागृत अशा हनुमंतरायांच्या मूर्तीची स्थापना केली. त्या पैकी खंडोबादेवाची सासुरवाडी असलेल्या नेवासा बुद्रुक येथील दक्षिणमुखी मारुती मंदिर देवस्थान हे एक तीर्थक्षेत्र आहे. नवसाला पावणारा मारुतीराया म्हणून या दक्षिणमुखी मारुती मंदिराची महाराष्ट्रात ख्याती आहे.

# बँकांमध्ये चलनी नोटांचा तुटवडा

**खातेदारांना केवळ २० हजार रुपयांपर्यंतच पैसे काढण्याची मुभा, ५०० रुपयांच्या नोटांचे प्रमाण कमी**

देवळाली प्रवरा : जिल्ह्यातील विविध बँकांमध्ये चलनी नोटांचा अचानक तुटवडा निर्माण झाला आहे. मोठी रक्कम काढण्यासाठी बँकांत गेलेल्या ग्राहकांना रक्कम उपलब्ध नसल्याचे सांगितले जात आहे. सध्या बँकेत ५०० रुपयांच्या नोटा उपलब्ध नसल्याने बँकेचे व्यवहार शंभराच्या आतील नोटांमध्ये केले जात आहेत.

लोकसभा निवडणूकीची रणधुमाळी सुरु झाली. जिल्ह्यातील विविध बँकांमध्ये ५०० रुपयांच्या नोटांचा तुटवडा जाणवत आहे. चलनातून अचानकपणे नोटा गायब कशा झाल्या. सर्वसामान्य व्यक्ती बँकेत ५० हजारांवरील रक्कम काढण्यास गेल्यास मोठी रक्कम शिल्लक नसल्याचे सांगितले जाते. प्रत्येक ग्राहकास केवळ २० हजारांपर्यंतची रक्कम दिली जात आहे. त्यामुळे बँक ग्राहकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

सर्वसामान्य ग्राहकांना दवाखना व इतर कामासाठी मोठी रकमेची गरज असताना बँका खातेदारांना पैसे देत नसल्यामुळे तीव्र संताप व्यक्त होत आहेत. बँकेत पै पै करुन जमा करुन ठेवलेले पैसे वेळेवर उपयोगी येत नसल्याने सर्वसामान्य खातेदार व बँक कर्मचाऱ्यांसोबत हुज्जत होत आहे. चलनाचा तुटवडा होवू द्या, नाही तर भुकंप होऊ द्या, आमचे पैसे आम्हाला द्या, अशी मागणी बँक ग्राहक करीत आहेत. लोकसभा निवडणूक सुरु झाली आणि बँकेतून ५०० रुपयांच्या नोटा कमी कमी होऊ लागल्या. राजकीय व्यक्तींनी बँकांमधून मोठ्या रकमा उचललेल्या असल्याचे काही बँक अधिकारी बोलत आहेत. 'जिसकी म्हैस, उसका दांडा' अशी अवस्था असून, आपल्या नेत्यासाठी प्रत्येक राजकीय व्यक्तीने नेत्याच्या सांगण्यानुसार निवडणूक निधी जमवून ठेवला आहे. त्यात सर्वसामान्यांचे मात्र नाहक हाल होत आहेत. जिल्हा बँकेत सध्या रोख रक्कम उपलब्ध नसल्याने रोख व्यवहारांवर मर्यादा घालण्यात आली आहे, असे जिल्हा सहकारी बँकेच्या राहुरी तालुक्यातील एका बँकेच्या शाखाधिकाऱ्यांनी नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले.

### दोन हजारांच्या नोटा चलनातून बंद

भारतीय रिजर्व्ह बँकेने दोन हजाराच्या नोटा चलनातून बाद केल्याने ५०० रुपयांच्या नोटांवर आता बहुतांश व्यवहार होतात. मात्र, आता बँकांमध्ये ५०० रुपयांचे चलन अचानक कमी पडू लागले आहे. यापूर्वी बँकेत उपलब्ध असलेले चलन पुरेशा प्रमाणात होते. निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर चलनाचा तुटवडा जाणवत असल्याने निवडणूक आयोग याची सखोल चौकशी करुन चलनी नोटांची टंचाई निर्माण करणाऱ्या राजकीय व्यक्तीवर कारवाई करणार का? असा प्रश्न सर्वसामान्य वर्गातून विचारला जात आहे.

## संक्षिप्त..

### शकुंतला कुलकर्णी यांचे निधन

अहमदनगर : मिरजगाव (ता. कर्जत) येथील शकुंतला लक्ष्मण कुलकर्णी (वय ८२) यांचे वृद्धापकाळाने नुकतेच निधन झाले. सध्या त्या शहरातील शनी मंदिर चौकात राहत होत्या. त्यांच्या मागे दोन मुले, मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या वांबोरी येथील महेश मुनोत विद्यालयाचे प्राचार्य संतोष कुलकर्णी व पालघर जिल्हा परिषदेचे उपअभियंता संजय कुलकर्णी यांच्या त्या मातोश्री होत. मनमिळाऊ स्वभाव व धार्मिक वृत्तीचे असल्याने ते सर्वांना सुपरीचीत होत्या. मिरजगाव येथील विठ्ठल मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी त्यांनी महत्त्वाचे योगदान दिले.

### मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन

नेवासे फाटा : नेवासे तालुका डॉक्टर्स असोसिएशन आणि एस.एम. बी.टी.हॉस्पिटल, घोटी यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून १ मे रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ या वेळेत नेवासा शहरातील बाजारतळ प्रांगणात करण्यात आले आहे. या शिबिरात खुबा बदली, गुडघा बदली, दुर्बिणीतून करण्यात येणाऱ्या शस्त्रक्रिया, मुतखडा प्रोस्टेट या महागड्या शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार असल्याची माहिती शिबिराचे प्रमुख मार्गदर्शक व नेवासा तालुका डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. करणसिंह घुले यांनी दिली. ते म्हणाले, की नेवासा तालुक्यातील नोंदीत बांधकाम मजुरांसाठी आरोग्य तपासणी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. केशरी व पिवळी शिधापत्रिकाधारकांसाठी शिबिरात आरोग्य तपासणी सुविधा देण्यात येणार आहे. शिबिरात तज्ञ डॉक्टर्स रुग्णांची तपासणी करतील व पुढील उपचार एसएमबीटी हॉस्पिटल, घोटी या ठिकाणी केले जातील. महात्मा फुले जनआरोग्य योजनेत अंतर्भूत उपचार पूर्णपणे मोफत केले जातील. योजनेत न बसणाऱ्या आजारांवरील उपचार अतिशय माफक दरात एसएमबीटी हॉस्पिटल येथे करून देण्यात येतील. शिबिरात खुबा बदली व गुडघा बदली शस्त्रक्रिया, दुर्बिणीतून करण्यात येणाऱ्या शस्त्रक्रिया, मुतखडा, प्रोस्टेट शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार आहेत. रुग्णांना तपासणी करून उपचाराविषयीचे नियोजन करण्याचे धोरण असेल. सरसकट सर्व रुग्णांना गोळ्या औषधे वाटण्यात येणार नाहीत, शिबिरात तपासणी केल्यानंतर उपचारायोग्य सर्व रुग्णांची व्यवस्था करण्यासाठी समर्पण फाउंडेशनमार्फत नियमित पाठपुरावा केला जाईल. शिबिरात हृदयरोग तज्ञ, मेडिसिन तज्ञ, अस्थिरोग तज्ञ, स्त्रीरोग तज्ञ, बालरोग तज्ञ, जनरल सर्जरी, त्वचारोग तज्ञ, कान नाक घसा तज्ञ, नेत्ररोग तज्ञ आदींचा समावेश असेल. शिबिराचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी आपल्या फॅमिली डॉक्टरकडे, तर बांधकाम मजुरांनी आपल्या गावातील ठेकेदाराकडे शिबिराविषयी चौकशी करावी, शिबिरासाठी नावनोंदणी आपल्या गावातील फॅमिली डॉक्टराकडे करण्याची सुविधा उपलब्ध असून शिबिरात येताना रुग्णांनी आपल्या आजाराच्या संबंधीत असलेली जुनी सर्व कागदपत्रे घेऊन यावीत, असे आवाहन डॉ. करणसिंह घुले यांनी केले आहे.

# संजीवनी पॉलिटेक्निकच्या सहा अभियंत्यांची नोकरीसाठी निवड

कोपरगाव : संजीवनी के.बी.पी. पॉलीटेक्निकच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट (टी. अँड पी.) विभागाने काळाची गरज ओळखून मेकॅनिकल व इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग विभागाच्या नवोदित अभियंत्यांना ऑटोमेशन या आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देऊन प्रशिक्षित केले. विभागातर्फे आयोजित कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये फेथ ऑटोमेशन या भारतातील व परदेशातील वाहननिर्मिती कंपन्यांसाठी इंडस्ट्री ४.० या प्रणालीनुसार कार्य करणाऱ्या स्वयंचलित रोबोटिक लाईन्स डिझाईन सोल्युशन देणाऱ्या कंपनीने सहा नवोदित अभियंत्यांची डिझाईन इंजिनिअर या पदावर निवड केल्याची माहिती संजीवनी



पॉलिटेक्निकने दिली आहे.

फेथ ऑटोमेशन कंपनीने नोकरीसाठी निवडलेल्या नवोदित अभियंत्यांमध्ये अनमोल कुमार, मोहम्मद लाराईब आलम, अथर्व सुनील नाईक, रोहन संतोष गडाख, साईश नीलेश सोनवणे व सिध्दार्थ किरण उगले यांचा समावेश आहे.

संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे अध्यक्ष नितीन कोल्हे यांनी सर्व निवड झालेल्या विद्यार्थी, पालकांचे व प्राचार्य ए. आर. मिरीकर यांचे अभिनंदन केले. मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांनी सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार केला. यावेळी डीन अॅकॅडेमिक्स डॉ. के. पी. जाधव, टी अँड पी विभागाचे प्रमुख प्रा. आय. के. सय्यद, विभाग प्रमुख प्रा. गिरीश वट्टमवार, प्रा. मोहीनी गुंजाळ, समन्वयक प्रा. नितीन आहेर व प्रा. पुणम थोरात उपस्थित होते.

# बालविकास मंदिर शाळेत शाळापूर्व तयारी मेळावा

सासवड : येथील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या बालविकास मंदिर शाळेत शाळापूर्व तयारी मेळावा उत्साहात पार पडला. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये पहिलीमध्ये दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा मेळावा आयोजित करण्यात आला होता. शाळेच्या प्रवेशद्वारावर रांगोळ्या काढल्या होत्या, तसेच फुग्यांची सजावट केली होती.

प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक भाऊसाहेब बडधे, पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मेघा जांभळे, शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा सीमा काळे यांनी मेळाव्याचे उद्घाटन केले. मुख्याध्यापक, सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी नवागतांचे आनंदाने स्वागत केले. प्राथमिक शिक्षण सुरू होण्यापूर्वी शिक्षणाची आनंददायी पद्धतीने पूर्वतयारी करून घेण्यासाठी हा मेळावा आयोजित केला होता.

मेळाव्यात नोंदणी , शारीरिक विकास , बौद्धिक विकास, सामाजिक व भावनिक विकास , भाषा विकास, गणनपूर्व तयारी, पालकांना मार्गदर्शन, असे ७ स्टॉल लावण्यात आले होते.



या मेळाव्यात पहिलीत प्रवेश घेतलेले १३६ विद्यार्थी सहभागी झाले होते. या उपक्रमाचे संस्थेच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष बाबासाहेब शिंदे, शालेय समितीचे अध्यक्ष ड. सागर नेवसे, महामात्र सुधीर भोसले यांनी कौतुक केले.

यावेळी मंजुषा चोरामले, आशा ढगे, शारदा यादव, शकुंतला आहेरकर, सुरेखा जगताप, माणिक शेंडकर, नरेंद्र महाजन, दीपक कांदळकर, संगीता कोल्हाळे, जयश्री काळाने, मनिषा जगताप, शीतल चौधरी, मीना खोमणे, स्वाती बोरावके, अश्विनी कदम, माधुरी जगताप , विद्यार्थी , पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सजवलेल्या बैलगाडीतून नवागतांचे स्वागत

**धोत्री शाळेचा उपक्रम, मुलांना गुलाबपुष्प, शालेय साहित्य अन् खाऊचे वाटप**

खर्डा : तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, धोत्री (केंद्र साकत) येथे नव्याने दाखल होणाऱ्या चिमुकल्यांची सजवलेल्या बैलगाडीतून वाजत-गाजत गावातून मिरवणूक काढून शाळेत दाखल करुन मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. एका छोट्या वाडीत एवढ्या मोठ्या प्रमाणात कार्यक्रम घेतल्याने पालक, ग्रामस्थ, विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते.



या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब धनवे यांच्या हस्ते फित कापून मेळाव्याला कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. नव्याने दाखल होणाऱ्या मुलांना गुलाबपुष्प, शैक्षणिक साहित्य व गोड खाऊ देऊन स्वागत करण्यात आले. मुख्याध्यापिका चंद्रकला खरपूडे यांनी सुंदर रांगोळी काढली होती. मुलांना विविध रंगांतील कागदी टोप्या, रंगीबेरंगी कपडे घातले होते. हातात झेंडे घेऊन वाजत-गाजत मिरवणूक काढण्यात आली. पहिली ते चौथीच्या मुली/ मुलांनी सुंदर लेझिम नृत्य सादर केले. विद्यार्थ्यांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले. लक्ष्मीरुपी कुंकवाचा ठसा शाळेतील विद्यार्थ्यांचे पाहिले पाऊल घेण्यात आले. त्यांचा उत्साह वाढावा म्हणून फुगे भेट देण्यात आले. मेळाव्यात विद्यार्थ्यांच्या विविध कृती पूर्ण करण्यासाठी स्टॉल लावण्यात आले. त्यात शारीरिक विकास, बौद्धिक विकास, सामाजिक विकास, भाषिक विकास विकसित व्हावे या उद्देशाने स्टॉल लावण्यात आले. सुंदर सेल्फी पॉईंटवर फोटो घेऊन सेल्फीचा सर्वांनी मनमुराद आनंद लुटला. गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब धनवे यांनी मुख्याध्यापिका चंद्रकला खरपूडे व उपाध्यपक अभिमान घोडेस्वार यांनी हा सुंदर कार्यक्रम घेतल्याबद्दल व शाळेची गुणवत्ता अतिशय चांगली असल्याबद्दल कौतुक केले. नंतर विद्यार्थी, पालकांना जेवण देण्यात आले. गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब धनवे, शिक्षक नेते किसन वराट, केंद्रप्रमुख नवनाथ बडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष घनश्याम अडाले, उपाध्यक्ष भाऊसाहेब अडाले, अविनाश कदम, दादासाहेब कदम, तात्याराम कदम, काकासाहेब अडाले, जगन्नाथ (आप्पा) मुळीक, अमोल खैरे, गणेश अडाले, रमेश काळभोर, नानासाहेब कार्ले, सतीश कदम, शहाजी अडाले, राजेंद्र सुपेकर, पप्पू भोसले, सुभाष मेंगडे आदींसह शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य व धोत्री ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राहाता बसस्थानकाची समितीकडून तपासणी

राहाता : हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियानांतर्गत सोलापूर विभागाचे विभाग नियंत्रक विनोद भालेराव यांच्या अध्यक्षतेखालील सर्वेक्षण समितीने शनिवारी राहाता बसस्थानकास प्रत्यक्ष भेट देऊन स्थानकातील सोयीसुविधा, स्वच्छता तसेच मूल्यांकनाचे निकषानुसार इतर बाबींची पाहणी व तपासणी करून सर्वेक्षण केले.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे वतीने हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियांतर्गत राज्यातील बसस्थानकाचे मूल्यांकन केले जात आहे. या सर्वेक्षणासाठी परिवहन महामंडळाचे विभागनिहाय सर्वेक्षण समित्या नेमण्यात आल्या आहेत. विभाग नियंत्रकांच्या अध्यक्षतेखालील सर्वेक्षण समितीमध्ये स्थापत्य अभियंता कामगार अधिकारी यांसह एक



पत्रकार व एक प्रवासी मित्र अशा प्रकारे समितीची रचना करण्यात आली आहे.

ही समिती बसस्थानकास प्रत्यक्ष भेट देऊन तेथील स्वच्छता, सुंदरता, तसेच सोयीसुविधांची पाहणी व इतर बाबी विचारात घेऊन मूल्यांकन करतात. हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियान १५ ते २० एप्रिलदरम्यान राबवण्यात आले. राज्य परिवहन महामंडळाच्या राज्यभरातील ३० विभागांमधून एकूण ५६३ बसस्थानकांचे या अभियानांतर्गत सर्वेक्षण केले जाणार आहे. २० रोजी दुपारदरम्यान परिवहन महामंडळाचे सोलापूर विभागाचे विभाग नियंत्रक विनोद भालेराव, स्थापत्य अभियंता श्रीकांत सूर्यवंशी, कामगार अधिकारी चंद्रकांत घाडगे, तसेच प्रवासी मित्र माजी सैनिक सत्यशोधक भानुदास गाडेकर, तसेच पत्रकारांनी बसस्थानकाचे सर्वेक्षण केले. राहाता बसस्थानक प्रमुख किरण राऊत, शीतल गाडेकर उपस्थित होत्या. बस स्थानकात उपलब्ध करून दिलेल्या सोयी सुविधा व सर्वेक्षणाच्या दृष्टीने असणारी माहिती स्थानक प्रमुख राऊत यांनी दिली. पूर्वी बसस्थानकात न येता बाहेरूनच निघून जात, मात्र प्रवासी मित्र सत्यशोधक भानुदास गाडेकर यांनी प्रत्येक बस ही राहाता बसस्थानकात यावी, यासाठी विशेष परिश्रम घेतले व प्रयत्न केल्याचे राऊत यांनी सर्वेक्षण समितीच्या अध्यक्षांना व सदस्यांना सांगितले. राहाता ग्रामस्थ तसेच प्रवाशांच्या वतीने सर्वेक्षण समितीचे अध्यक्ष तथा सोलापूर विभाग नियंत्रक विनोद भालेराव, तसेच स्थापत्य अभियंता श्रीकांत सूर्यवंशी व कामगार अधिकारी चंद्रकांत घाडगे यांचे स्वागत करण्यात आले. समितीचे अध्यक्ष भालेराव यांनी राहाता बस स्थानकाचा झालेला कायापालट व येथे निर्माण केलेल्या सोयी सुविधा असलेली स्वच्छता व बसस्थानकामध्ये येण्याचे वाढलेले प्रमाण याबाबत समाधान व्यक्त केले.

# डॉ. अशोक घोणे यांना महाराष्ट्ररत्न राज्यस्तरीय पुरस्कार २०२४ प्रदान

सासवड : युवा महाराष्ट्र फाउंडेशन समिती, पुणे यांच्या वतीने १६ एप्रिल रोजी पंडीत जवाहरलाल नेहरू कलादालन, ढोले रोड येथे विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा महाराष्ट्ररत्न पुरस्काराने सन्मान करण्यात आला. पुरस्कारार्थीमध्ये पुण्यातील सेवाभावी कार्यकर्ते जहांगीर हॉस्पिटलमधील सुप्रसिद्ध डॉ. अशोक घोणे यांना त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल राज्यस्तरीय महाराष्ट्ररत्न पुरस्कार २०२४ देण्यात आला. अभिनेत्री झेबा शेख, अभिनेत्री मोनालीसा बागल, अभिनेते वैभव चव्हाण, रुही तारू यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. गणेश विटकर, डॉ. अविनाश सकुंडे, डॉ. संजीव टांकसाळे, कार्तीक पालीवाल, सचिन जाधव, सोनू उर्फ मारुती चव्हाण, डॉ. नितीन बोरा, श्रध्दा राहुल जवंजाळ आदी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी पीयुष न्युट्रीफार्मा, टॉक इंडिया न्यूज, दुनियादारी चहा, सोनु म्युझिक यांचे सहकार्य लाभले. डॉ. अशोक घोणे यांना त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल आतापर्यंत ९० पुरस्कार मिळालेले आहेत. हा त्यांचा ९१ वा पुरस्कार आहे. त्यामुळे त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनचा वर्षाव करण्यात आला.



श्रीरामपूर येथील जागृत देवस्थान श्रीराम भक्त श्री हनुमान मंदिरात मोठ्या उत्साहात हनुमान जयंती साजरा करण्यात आली. त्यावेळी श्री हनुमान जन्मोत्सवानिमित्त भगवंताचा पाळणा हलवताना तहसीलदार मिलिंदकुमार वाघ मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष मनीलाल पोरवाल, सचिव सुनील गुप्ता, गजेंद्र डावखर, मंदार बोरावके,माजी माजी नगराध्यक्ष अनुराधाताई आदिक, अर्चना पानसरे, रंजनाताई पाटील, प्रल्हाद महाराज पांडे, तेजस जंबे, आदी दिसत आहे. (छाया. सुनील पांढरे)

# पुरंदरमध्ये वन क्षेत्रात उभारले कृत्रिम पाणवठे

सासवड : पुरंदर तालुक्यातील पावसाची कमतरता लक्षात घेता आणि मानव व वन्यजीवातील संघर्ष टाळण्यासाठी वन विभागाच्या वतीने वन क्षेत्रालगत असलेल्या मालकी क्षेत्रात, तसेच वन क्षेत्रात कृत्रिम स्वरूपाचे पाणवटे तयार केले असून, गेली तीन-चार महिन्यांपासून वन्य प्राण्यांसाठी पाण्याची सोय केली आहे. दुष्काळी परिस्थिती पाहता वन क्षेत्रालगत असलेल्या गावकऱ्यांनी वन्य प्राण्यांना लागणाऱ्या पाण्यासाठी गावात उपलब्ध होत असलेले पाणी वन विभागाच्या कर्मचाऱ्यांना संपर्क करून सहकार्य करावे , वन्य प्राण्यांचे स्थलांतर आणि स्थलांतरीत होत असणारा मानव वन्य जीव संघर्ष टाळण्यासाठी तालुक्यात ठिकठिकाणी वन्य प्राण्यांसाठी कृत्रिम पाणवटे तयार करण्यात आले असून, पावसासाठी अजून दोन-तीन महिन्यांचा कालावधी असल्याने वन विभागाच्या वतीने सर्व ठिकाणी पाण्याची सोय करण्यात येत आहे. त्यासाठी तालुक्यातील सर्व नागरिकांनी, वन्य प्राण्यांच्या पाण्याची सोय करण्यासाठी तालुक्यातील गावागावांमध्ये पाण्याची सोय होत असल्यास वन विभागाच्या कर्मचाऱ्यांशी संपर्क साधून वन्य प्राण्यांच्या पाण्याची सोय करण्यासाठी सहकार्य करावे. वन्यजीव आणि मानवी संघर्ष टाळण्यासाठी वन विभाग आणि नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेऊन सजीव सृष्टीतील महत्त्वाचा भाग असलेल्या वन्य प्राण्यांचे संरक्षण संवर्धन आणि संगोपन करण्यासाठी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवावा असे आव्हान वनपरिक्षेत्र अधिकारी सासवड यांच्या वतीने करण्यात आले आहे. जेजुरीतील जय मल्हार फाउंडेशनच्या वतीने पाण्याची सोय केली जाते. एस. एस. इंटरप्राईजेस चाकण त्याचबरोबर दगडूशेठ हलवाई यांच्या वतीने ही पाण्यासाठी सहकार्य केले जात असून, इच्छुकांनी वन विभागाशी संपर्क साधून वन्य प्राण्यांच्या संवर्धन, संरक्षण संगोपनासाठी आपला खारीचा वाटा नोंदवावा, असे आवाहन केले आहे.

# भिस्तबाग शाळेतील चौथीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

अहमदनगर : शहरालगत असलेल्या भिस्तबाग जिल्हा परिषद शाळेतील चौथीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करुन वेदांत विकास नजन व जय नागनाथ काजळकर यांना स्टुडंट्स ऑफ द इयर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

अद्यावत व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या या जिल्हा परिषद शाळेचे भौतिक सुविधांनी रुप पालटले असताना परिसरातील विद्यार्थ्यांचा ओढा शाळेकडे वाढला आहे.

इयत्ता पहिलीसाठी प्रवेश घेतलेल्या नवोदित विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. गुणवंत व स्टुडंट्स ऑफ द इयर पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांना शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता काळे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

यावेळी सहशिक्षिका सुरेखा वाघ, शितल आवारे, योगिता वाघमारे, अहिल्या सांगळे



आदींसह विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रारंभी विद्यार्थ्यांनी शिक्षकांचे स्वागत करुन शाळेबद्दल मनोगत व्यक्त केले. इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी इतर शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. तर शाळेसाठी छत्रपती संभाजी महाराजांची प्रतिमा भेट दिली.

अनिता काळे म्हणाल्या की, मुलांना शाळेतून जीवनावश्यळक शिक्षण मिळणे सर्वात महत्त्वाचे आहे. नवीन शैक्षणिक धोरणातून भारताचा सक्षम नागरिक घडणार आहे.

शिक्षणाबरोबरच मुलांना संस्कार व महापुरुषांचे विचार रुजवणे आवश्यक आहे. त्याच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी शिक्षक झटत असतात, शिक्षणाबरोबर कौशल्य निर्माण करण्याचा शिक्षकांचा प्रयत्न आहे. उत्कृष्ट शिक्षक व त्यांना साथ देणारे पालक शिक्षण क्षेत्रात क्रांती घडवून आणू शकतात.

नेतृत्व संपन्न विद्यार्थी ही राष्ट्राची संपत्ती आहे. ज्ञानसागरातील राजहंस निर्माण करुन सक्षम पिढी घडविण्याचे कार्य जिल्हा परिषद शाळेच्या माध्यमातून सुरु असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन जय काजळकर व वेदांत नजन यांनी केले.

**संक्षिप्त...**



## डॉ. मानसी साकोरे हिचे युपीएससी परीक्षेत यश

निघोज : केंद्रीय लोकसेवा आयोगाने घेतलेल्या भारतीय नागरी सेवा परीक्षेमध्ये सलग दुसऱ्यांदा यश संपादन केलेल्या केंदूर पाबळ ची कन्या डॉ. मानसी नानाभाऊ साकोरे हिने देशपातळीवर ५३१ वी रँक मिळवली. या यशाबद्दल शिरूर येथील विद्याधाम प्रशालेच्यावतीने तिचा सत्कार करण्यात आला.

प्रशालेचे प्राचार्य संजय शेळके, पर्यवेक्षक बाबुराव कोकाटे, गुरूदत्त पाचर्णे, शिवाजी पर्बत यांच्या हस्ते डॉ. साकोरे हिचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी मानसीचे वडील नानाभाऊ साकोरे, आई रंजना साकोरे उपस्थित होते. यावेळी डॉ. साकोरे बोलताना म्हणाली की, मराठी माध्यमाचा फार न्यूनगंड न बाळगता अभ्यास केल्यावर यश मिळवता येते. कार्यक्रमाचे प्रास्तविक अर्जुन वनवे यांनी केले, सूत्रसंचालन दिपक गुजर यांनी केले. आभार प्रदर्शन संजय देशपांडे यांनी केले.

# हळद लावून श्री मळगंगा देवीच्या यात्रोत्सवाला प्रारंभ

## निघोज येथील नवसाला पावणारी व जागृत देवस्थान श्री मळगंगा देवी

**सुरेश खोसे पाटील**

निघोज : राज्यात प्रसिद्ध असलेली नवसाला पावणारी व जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेले निघोज येथील श्री मळगंगा देवीच्या यात्रोत्सवा निमित्ताने अनेक महिलांनी देवीला हळद लावल्याने यात्रेला प्रारंभ झाला.

देवीला हळद लावण्यात आल्याने देवीच्या यात्रोत्सवाला प्रारंभ झाला. देवीचे पुजारी ठकाराम गायखे, सुनिल गायखे व इतरांनी श्री मळगंगा देवीची विधिवत पूजा, अर्चा केल्यानंतर सायंकाळी ५ वाजता अत्यंत उत्साहात वाजत गाजत अनेक महिलांच्या उपस्थित हळद मिरवणूक मंदिरापासून ते नवसाची घागर ज्या बारवेत निघते तेथ पर्यंत काढण्यात आली. अनेक महिलांच्या हस्ते देवीला हळद लावण्यात आली व त्यानंतर घागर निघणाऱ्या हेमांड पंथीय बारवेतील देवीच्या मुर्तीची पूजा अर्चा करत हळद लावण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी महिलांनी श्री मळगंगा देवीची गाणी गात मोठ्या भाव वातावरण गाण्यात गायली. यात्रेनिमित्त ८५ फूट उंचीच्या मानाच्या मोठ्या काठीची मिरवणूक निघोज गावातून ही काढण्यात आली व तदनंतर ही मानाची काठी मंदीराजवळ उभारण्यात आली .

राज्यात प्रसिद्ध असलेली, जागृत व नवसाला पावणारी देवी म्हणून निघोजच्या श्री मळगंगा देवीची राज्यभर ख्याती असल्याने लाखो भाविक मिळेल त्या साधनाने निघोजला देवीच्या दर्शनासाठी गर्दी करतात. बुधवार (दि.१) मे देवीचा अंबिल वर्तविणे, नवस पुर्तीचा बगाड गाडा मिरवणूक, रात्री छबिना आणि मानाच्या ८५ फूट काठीची अत्यंत उत्साह व भावपूर्ण वातावरणात मिरवणूक



काढण्यात येणार असून मध्यरात्रीचे खास आकर्षण व वैशिष्ट्ये असलेल्या घागरीचे मनोभावे दर्शन होते. गुरुवार (दि २) घागरीची भव्य मिरवणूक निघते. यावेळी वर्षभरातील सर्वात मोठ्या गर्दीची नोंद होते. जिकडे तिकडे भाविक भक्तांचा महापूर दिसून येतो. दुपारी देवीच्या पालखीची मिरवणूक काढण्यात आल्यानंतर खऱ्या अर्थाने कुंडावरील कुंडाई देवीच्या यात्रेला प्रारंभ होतो. शुक्रवार (दि.३) कुंडावरील देवीच्या दर्शनासाठी भाविकांची तुफान गर्दी होती. यावेळी या यात्रेत लहान मुलांच्या विविध वस्तू, खेळणी दुकाने, शितपेय, खादय पदार्थ, शेतकऱ्यांसाठी लागणारी शेतीपयोगी वस्तू , महिलांसाठी घरगुती वस्तू यांची मोठ मोठी दुकाने, पाळणे यांची मोठी रेलचेल असते. खरेदी करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर भाविक या यात्रेला भेट देतात. ज्या वस्तू कुठे मिळत नाही त्या वस्तू येथे हमखास मिळतात. पारनेर तालुक्यातील सर्वांत मोठी यात्रा कुंडावर भरते तर रात्री खास तमाशा शौकिनांसाठी राज्यातील नामांकित तमासगिरांच्या ममाशाचे फड येथे मोठ्या उत्साहात आपली कला सादर करून रसिकांची दाद मिळवितात. संध्याकाळी ५ वाजता नामवंत पहिलवानांच्या कुसत्यांचा जंगी हगामा यावेळी भरविण्यात येतो. यावेळी रोख स्वरूपात मोठ मोठी बक्षिसे देण्यात येतात. या हगाम्यासाठी दूर दूर वरून नामांकित पहिलवान हजेरी लावून आपली कसबपणाला लावून कुस्ती निकाली कुस्त्या होतात.

# केडगावमध्ये भगवान महावीर जयंतीनिमित्त शोभायात्रा

अहमदनगर : अहिंसा परमो धर्म:ची शिकवण देऊन संपूर्ण मानव जातीच्या कल्याणाचा उपदेश करणारे भगवान महावीर स्वामींचा जन्मकल्याणक (जयंती) केडगावमध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गुरुदेव युवा मंचच्या वतीने केडगाव परिसरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत जे.एस.एस. गुरुकुलच्या विद्यार्थ्यांचे लेझीम पथक व सांस्कृतिक कार्यक्रमाने सर्वांचे लक्ष वेधले.

शोभायात्रेत सनई, नगारा, चौघडा, बॅण्ड पथकासह डोक्यावर मंगल कलश घेतलेल्या मुली, विविध वेशभूषा परिधान केलेले लहान मुले-मुली, पांढरे शुभ्र वस्त्र परिधान केलेले पुरुष, केसरी, लाल साड्या परिधान केलेल्या महिला भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. या शोभायात्रेचे चौका-चौकात



स्वागत करण्यात आले. शोभा यात्रेच्या अग्रभागी भगवान महावीर स्वामींची प्रतिमा असलेले रथ होते. विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकाने विविध डाव सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. त्रिशलानंदन वीर की, जय बोलो महावीर की... अशा घोषणांनी परिसर दुमदुमला होता.

भूषणनगर एकता कॉलनी येथून शोभा यात्रेचे प्रारंभ झाले. नगर-पुणे रोड मार्गे केडगाव बस स्थानक, अंबिका बस स्थानक येथून मार्गक्रमण होऊन पाच गोडाऊन जवळील केडगाव जैन धर्मस्थानक येथे शोभा यात्रेचा समारोप झाला. यावेळी साध्वी नवीन ज्योतीजी म.सा. यांनी भगवान महावीर यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमास सचिन कोतकर यांनी भेट देवून सर्व भाविकांना भगवान महावीर जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. केडगाव जैन धर्मस्थानक परिसरात संदिप उद्योग समुहाच्या माध्यमातून पेव्हिंग ब्लॉग बसवून सुशोभिकरण करण्याचे आश्वासन दिले. विद्यार्थ्यांनी नाटिकेतून भगवान महावीर यांनी मानव जातीच्या कल्याणासाठी दिलेली शिकवण सांगितली. शेवटी भाविकांना प्रसाद वाटप करण्यात आले.

## डॉ. माधुरी ठोंबरे दूरदर्शनवर



अहमदनगर : दूरदर्शनच्या सखी सह्याद्री या कार्यक्रमामध्ये साईराम न्युट्रीकेअरच्या संचालक आहारतज्ञ डॉ. माधुरी ठोंबरे यांची दूरदर्शन सुत्रसंचालिका चैताली कानिटकर यांच्यासोबतची थेट मुलाखत होणार आहे. या कार्यक्रमाचे प्रक्षेपण गुरूवार (दि.२५) दुपारी १२ वा. होणार आहे. याच कार्यक्रमाचे पुन:प्रक्षेपण त्याच दिवशी रात्री ११ वा. आणि शुक्रवार (दि.२६) सकाळी ९ वा. दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरून होणार आहे. महीलांना मानसिक, शारीरीक व वाढते ताणतणाव यावर मार्गदर्शन व महीलांसाठी पोषक आहार कसा असावा यावर त्या मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# महावीर जयंतीनिमित्त आनंदधाम येथे भक्तीसंध्या

अहमदनगर : जैन सोशल फेडरेशनच्यावतीने भगवान महावीर स्वामी जयंतीनिमित्त आयोजित भक्तीसंध्या कार्यक्रमातील समधुर गीते, भजनांमुळे वातावरण प्रफुल्लित बनले होते. इंदौर येथील प्रसिध्द गायिका डॉ. श्रध्दा जगताप व सृष्टी जगताप या आई व मुलीच्या जोडीने एकाहून एक सरस गीते सादर करीत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. जगताप यांच्या जादूई आवाजाची मोहिनी उपस्थितांना पडली.

भगवान महावीर स्वामी जयंतीनिमित्त दरवर्षी जैन सोशल फेडरेशनतर्फे आनंदधामच्या प्रांगणात प्रबुध्द विचारक पूज्य आदर्शऋषीजी यांच्या प्रेरणेने भक्तीसंध्येचा कार्यक्रम घेण्यात येतो. यंदाही या कार्यक्रमाला उदंड प्रतिसाद मिळाला. जगताप मायलेकीच्या ऐ मालिक तेरे बंदे हम, ओ पालन हारे, कृपा अपनी सदा, जय जय हे त्रिशला नंदन,




जन्मे है महावीर प्यारे, सत्यम शिवम सुंदरम, इक राधा इक मीरा, गणनायकाय गणदैवताय, ज्योत से ज्योत जगाते चलो, तू प्यार का सागर है, ऐरणीच्या देवा तुला, जय बोलो महावीर स्वामी की, मेरी लगी गुरु संग प्रीत अशा गीतांना वातावरण भारावून गेले होते. उपस्थितांना खिळवून ठेवणारे जादूई सूर, संगीत कार्यक्रमाचे वैशिष्ट्ये ठरले. वंदे मातरम् गीताने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी प्रत्येकाच्या मनात देशप्रेमाचा अभिमान जागृत झाला.

या भक्तीसंध्या कार्यक्रमात आपल्या अद्भुत कलेने रंग भरणाऱ्या डॉ. श्रध्दा व सृष्टी जगताप यांचा कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या अनिता सचिन भंडारी, पल्लवी अमोल पटवा, वैशाली राजेंद्र गांधी, आनंद बोरा, गिरीश शिगी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमासाठी जैन सोशल फेडरेशनच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

# शहरात हनुमान जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात

अहमदनगर : शहरातील सर्जेपुरा येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिरात नुकतेच हनुमान जयंती निमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. हनुमान भक्त मित्र मंडळातर्फे महाप्रसाद वाटप करण्यात आले असून सदर मंडळाचे हे पाच वर्ष असून मंदिराचे मुख्य पुजारी कन्हैयालाल परदेशी, प्रवीण परदेशी यांनी मंदिर परिसरात जागा उपलब्ध करून दिली आहे.

महाप्रसाद पहाटेपासून दिवसभर चाललेले असून अनेक हनुमान भक्तांनी प्रसादाचा लाभ घेतला. हनुमान भक्त मित्र मंडळातर्फे ॲड. विक्रम वाडेकर (विश्वस्त, मोहटा देवस्थान पाथर्डी), सावन छाब्रा, प्रदीप वाखुरे, नगरसेवक अजिंक्य बोरकर, कमल कोहली, ॲड. संदीप पाखरे, विशाल बोराडे, विक्रम नारंग, हिरा मोतीयानी, महेश गोपालकृष्णन, हार्दिक जगड, संग्राम खिलारी, पवन पारेक, राहुल हसेजा, पवन खितानी आदींनी विशेष परिश्रम घेतले.

**नालेगाव हनुमान जयंतीनिमित्त कीर्तन**

भगवंताचे नाम चितन केल्यावर कुठलेही संकट मनुष्यावर येत नाही. वाल्या-कोळ्याचा उद्धार झाला तो फक्त नाम चिंतनाने. आपण जे काम करत असतो त्या कामाच्या वेळी देखील भगवंताचे नाव घेऊ शकतो. आपल्या कामात देखील परमेश्वर असतो. आपल्याबरोबर संपत्ती येणार नाही तर आपण समाजामध्ये केलेल्या चांगल्या कामाची पावती बरोबर येणार असे प्रतिपादन बापू महाराज लोंढे यांनी केले.

नालेगाव गाडगीळ पटांगण येथे हनुमान जयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज तरुण मंडळाच्यावतीने लोंढे महाराज यांचे कीर्तन संपन्न झाले. यावेळी नालेगाव ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

धार्मिक कार्यक्रमाच्या माध्यमातून चांगली पिढी निर्माण होत असते. यासाठी सालाबाद प्रमाणे नालेगाव गाडगीळ पटांगण येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले जात आहे. आजची युवा पिढी धार्मिकते पासून लांब चालली आहे. त्यांना संत महंतांच्या विचाराची खरी गरज आहे. धार्मिक कार्यक्रमाच्या माध्यमातून आपली परंपरा व संस्कृती जोपासण्याचे काम





होत असे मत माजी नगरसेवक दत्तात्रय मुदगल यांनी व्यक्त केले.

**नाना पाटील वस्ताद तालिमच्यावतीने हनुमान जयंती साजरी**

शक्ती आणि भक्तीचा मिलाप म्हणजे बजरंगबली होय. प्रभू रामचंद्रांची नि:स्सीम भक्ती करुन निष्ठा कशी असावी भगवंत हनुमानांनी आपल्या सेवेतून दाखवून दिले आहे. हा आदर्श आपल्या जीवनात अंगीकृत



करण्याची गरज आहे असे प्रतिपादन मनपा माजी स्थायी समिती सभापती गणेश कवडे यांनी केले.

हनुमान जयंतीनिमित्त नाना पाटील वस्ताद तालिमच्यावतीने कावडीने आणलेल्या पवित्र पाण्याने अभिषेक करण्यात आला. याप्रसंगी रामभाऊ नळकांडे, बापू शेळके, नितीन रोहोकले, मळू वामन, दत्ता ठागणे, अतुल वाकचौरे, बजरंग





महाराज शेळके, बापू दिवेकर, राजू म्हस्के, पप्पू गुंजाळ, मन्नी शिदे, अनिल कवडे, ओंकार कवडे, निलेश काळे, बाळू काळे, शैलेश काळे, सोहम वाव्हाळ, शाम शिदे, शंभुराज भुतकर, अमर शिदे आदि उपस्थित होते.

**माळीवाडा येथील शनी-मारुती मंदिर येथे श्री हनुमान जन्मोत्सव सोहळा**

माळीवाडा येथील शनी-मारुती मंदिर येथे श्री हनुमान जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी ठिक ६ वा. जन्मोत्सवाच्यावेळी श्री विशाल गणपती मंदिराचे पुजारी संगमनाथ महाराज यांच्या हस्ते अभिषेक करुन महापुजा करण्यात आली. भजनी मंडळाच्या महिलांनी पाळणा हलवून हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी देवस्थानचे विश्वस्त पांडूरंग नन्नवरे, रंगनाथ फुलसौंदर, अशोक भंडारी, बाळासाहेब आगरकर, राज जाधव, जिवाप्पा बहिरवाडे, हर्षल म्हस्के आदिसह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. तसेच मंदिर परिसर फुलांसह आकर्षक सजावट करण्यात आली होती.



नगर शहरातील स्टेट बँक चौक, सर्जेपुरा, दिल्लीगेट, लक्ष्मी कारंजा, माळीवाडा, नेप्तीगेट, झेंडीगेट, नेता सुभाष चौक, नालेगांव, वारुळाचा मारुती, नवग्रह मंदिर, भुतकरवाडी, श्रमिकनगर, पावन हनुमान मंदिर, बालिकाश्रम रोड, खाकीदास बाबा मठ, नित्यसेवा सोसायटी, मार्कंडेय सोसायटी गुलमोहोर रोड, तपोवन, भोसले आखाडा, अरणगांव रोड, रेल्वेस्टेशन, केडगांव, एकनाथनगर, भिगार येथील रोकडेश्वर मंदिरावर आकर्षक सजावट करण्यात आली होती. भाविकांनी पहाटेपासूनच दर्शनासाठीसाठी रांगा लावल्या होत्या. रुईच्या पानांचा हार, मंदिराबाहेर नारळ, टरबुज-खरबुजाचा प्रसादाचे आयोजन करण्यात होते.

कौठीची तालिम, नानापाटील वस्ताद, वाडिया पार्क तालिम, गणपतीची तालिम, सातपुते तालिम, झारेकरगल्ली आदि ठिकाणीची तालमींवर रोषणाई करुन सजावट करण्यात आली होती.

हनुमान जयंतीनिमित्त गेल्या ४० दिवसांपासून नगर शहरात चौका-चौकात हनुमान चालिसा पाठाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, लक्ष्मीनारायण सत्संग मंडळ, श्री रामभक्त हनुमान सत्संग मंडळ, मंगल भक्त सेवा मंडळ आदि मंडळाने शहरात व उपनगरात हनुमान चालिसाचे पठण करुन भाविकांना मंत्रमुग्ध केले.

**निमगाव वाघात हनुमान जन्मोत्सव सोहळा साजरा**

निमगाव वाघा (ता. नगर) गावात हनुमान जन्मोत्सव सोहळा मंगळवारी (दि.२३) विविध धार्मिक कार्यक्रमांनी भक्तीमय वातावरणात पार पडला. हनुमान मंदिरामध्ये पहाटे विधिवत पूजा व आरती करण्यात आली. रात्री भजनाच्या भक्तीरसात भाविक तल्लीन झाले होते.

गावातील भजनी मंडळाने रामभक्त हनुमानजींवर विविध भजन सादर केले. पहाटे मंदिरात अभिषेक करुन आरती करण्यात आली. यावेळी दिवसभर भाविकांनी हनुमानजींच्या मंदिरात दर्शनासाठी गर्दी केली होती. भाविकांना यावेळी प्रसादाचे वाटप करण्यात आले. तसेच मंदिरास आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

या धार्मिक कार्यक्रमास डोंगरे संस्थेचे अध्यक्ष नाना डोंगरे, पिटू जाधव, भरत बोडखे, तुकाराम फलके, सचिन कापसे, सुरेश जाधव, भाऊसाहेब कापसे, बाबा खळदकर, संदीप डोंगरे, अनिल डोंगरे, पोपट भगत, अजय ठाणगे, गोरख गायकवाड, छगन भगत, दत्तू फलके, विठ्ठल फलके, तुकाराम खळदकर, चंद्रकांत जाधव आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रस्त्यावरील बंद वहाने व साहित्य हटविले



अहमदनगर : अहमदनगर महानगरपालिकेच्यावतीने प्रशासक तथा आयुक्त डॉ. पंकज जावळे यांच्या उपस्थितीत विशेष मोहिम राबविण्यात आली. या अंतर्गत जुने जिल्हाधिकारी कार्यालय ते पोस्ट ऑफिस चौक आणि शासकीय विश्रामगृह रस्त्यावरील बंद चारचाकी वहाने, भंगार साहित्य हटविण्यात आले.

शहरातील रस्त्यांवर बंद असलेले वहाने नागरिकांनी दोन दिवसात हटवावेत अन्यथा महापालिकेच्या वतीने सदर वहाने जमा करून घेण्यात येतील व दंडात्मक कारवाई करण्यात येईल. शहरातील चौपाटी येथील खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी डस्टबिनचा वापर करावा.

ओला व सुका कचरा वेगळा करावा. तसेच सार्वजनिक ठिकाणी, रस्त्यावर कचरा टाकू नये असे आढळून आल्यास कडक कारवाई करण्यात येईल असे प्रशासक तथा आयुक्त डॉ. जावळे यांनी सांगितले.


प्रोसेस फि जमा रु.
प्रोसेस पान नं.
ने. ता. १२/०६/२०२४

ॲड. सुभाष विठ्ठलराव भोर
ॲड. पल्लवी एस. भूमकर-सुपेकर
अहमदनगर
नि. नं. १२

**जाहीर समन्स**

अहमदनगर येथील मे. जिल्हा व सत्र न्यायाधिश साहेब, यांचे कोर्टात

रेग्युलर सि. अपील नं. १४४/२०२३

अपेलंट
दिलीप गणपत कांबळे
रिस्पाडंट
शिवाजी गणपत कांबळे,वगैरे

प्रति,
रेस्पॉडंट नं. १ — शिवाजी गणपत कांबळे (मयत)
वारस- १ अ) मार्या उर्फ मार्था शिवाजी कांबळे
रा. प्लॉट नं. १०, जय मल्हार पार्क जवळ, लेखानगर, सावेडी, अहमदनगर
१ब) अभिजित शिवाजी कांबळे
१क) वैशाली शिवाजी कांबळे
१ड) मनिषा शिवाजी कांबळे
१ ब ते १ ड रा. कोल्हेवाडी, ता. जि. अहमदनगर
रिस्पॉडंट नं. २ — मार्या उर्फ मार्था शिवाजी कांबळे
रा. कोल्हेवाडी, ता. जि. अहमदनगर
रिस्पॉडंट नं. ३ — भाऊराव बन्सी नगरे
रा. पारनेर, ता. पारनेर, जि. अहमदनगर
रिस्पॉडंट नं. ४ — चांगदेव शिवाजी बनकर
रा. कोल्हेवाडी, ता. जि. अहमदनगर.

ज्या अर्थी आपणास या जाहीर समन्सने कळविण्यात येते की, सदर अपीलामध्ये आपण रेस्पॉडंट नं. १ ते ४ म्हणून सामील आहात. परतु सदर अपीलामध्ये अद्यापपर्यंत आपणास समन्सची बजावणी होऊ शकलेली नाही म्हणून सदर अपेलंटने सदर अपीलात नि. १० अन्वये जाहीर समन्स काढणेकरीता केलेल्या अर्जावर मे. कोर्टाने हुकूम करुन वृत्तपत्रात जाहीर समन्स प्रसिद्ध करण्याबाबत दिनांक-०५/०४/२०२४ रोजी हुकूम केलेला आहे. सदर अपीलाचे कामी आपले म्हणणे/खुलासा सादर करणेकामी सदर अपील दि. १२/०६/२०२४ रोजी नेमलेले असून सदरहू तारखेस सकाळी १०.३० वाजता मे. न्यायालयात आपण समक्ष अथवा वकीलांमार्फत हजर रहावे.

त्याअर्थी आपण सदरहू तारखेस मे.कोर्टात हजर न राहिल्यास मा. न्यायालय लागलीच सदरहू अपीलामध्ये पुढील योग्य तो आदेश करतील याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २३/०४/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

हुकूमावरुन
सही — बेंच क्लार्क, जिल्हा न्यायालय, अहमदनगर
शिक्का
सही — अधिक्षक, जिल्हा न्यायालय, अहमदनगर

# संकल्प झाले बहु..!

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदानाला अवघे काही दिवस शिल्लक असताना काँग्रेसने सर्वप्रथम आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्याला काँग्रेसने न्याय पत्र असे नाव दिले. त्यावर मुस्लिम लीग आणि डाव्यांचा ठसा असल्याचे पंतप्रधान मोदी म्हणाले होते. आता भाजपने आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला असून त्याला संकल्प पत्र असे नाव देण्यात आले आहे. भाजपचा जाहीरनामा ७६ पानांचा आहे आणि त्यात विकसित, स्वावलंबी भारताचे चित्र उभे करण्यात आले. समान नागरी संहिता, पाइपलाइनद्वारे सर्वांना गॅस उपलब्ध करून देणे आणि करोडो घरांना मोफत वीज पुरवणे अशी आश्वासने दिली आहेत. मोफत वीज पुरवठा हा मोफत नसून लोकांनी स्वतः वीज निर्माण करायची आहे. 'नव्या बाटलीत नवी दारू', 'जुमलापत्र' अशी टीका विरोधी पक्षनेत्यांनी केली आहे. अर्थात काँग्रेसच्या जाहीरनाम्यावरही अशी टीका झाली होती. भाजपचे म्हणणे आहे, की हा दस्तावेज पुढच्या सरकारचे व्हिजन असेल. ज्या गोष्टी पूर्ण करता येतील, अशाच गोष्टी जाहीरनाम्यात लिहाव्यात, असा मुद्दा भाजपने मुरली मनोहर जोशी यांच्याकडे जेव्हा जाहीरनाम्याची जबाबदारी दिली होती, त्या वेळी चर्चिला गेला होता. त्यानंतरच जाहीरनाम्याला संकल्पपत्र असे नाव देण्यात आले. एकीकडे व्हिजन डॉक्युमेंट म्हणायचे आणि दुसरीकडे केवळ औपचारिकता म्हणून तो प्रसिद्ध करायचा, अशी पद्धत भाजपने गेल्या निवडणुकीपासून सुरू केली. गेल्या वेळी तर निवडणुकीचे काही टप्पे पूर्ण झाल्यानंतर जाहीरनामा प्रकाशित करण्यात आला होता. भाजपने राम मंदिर, समान नागरी संहिता, काश्मीरमधून कलम ३७० हटवणे इत्यादी प्रमुख मुद्यांचा आपल्या जाहीरनाम्यात समावेश केला होता. भाजपने आतापर्यंत यातील दोन प्रश्न सोडवले आहेत. नागरी संहितेबाबत भाजपने पावले टाकायला सुरुवात केली आहे. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार सत्तेवर आल्यावर संपूर्ण देशात त्याची अंमलबजावणी करण्यावर भाजपने या जाहीरनाम्यात भर दिला आहे. भाजपच्या म्हणण्यानुसार, या वेळी देशातील मुख्य समस्या ज्या उरल्या आहेत किंवा ज्यांवर दोन सरकारांमध्ये काम होऊ शकले नाही, त्यावर काम करण्याबाबत बोलले आहे. पहिल्या दोन मुद्यावर नजर टाकली तर आता फक्त समान नागरी संहितेची अंमलबजावणी उरली आहे, हा मुद्दा भाजपने जाहीरनाम्यात मांडला आहे, म्हणजेच सरकार सत्तेवर आल्यावर त्यात प्राधान्य दाखवेल, असा विश्वास आहे. उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीच्या वेळी २०१२ मध्ये काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्याला 'व्हिजन डॉक्युमेंट' असे नाव दिले होते. त्या वेळी राहुल गांधी खूप उत्साहात होते. त्यानंतर सर्वच राजकीय पक्षांमध्ये निवडणूक जाहीरनाम्याला वेगळे नाव देण्याची परंपरा सुरू झाली. यापूर्वी भारतीय राज्यघटनेच्या निर्देशात्मक तत्त्वांचा उल्लेख निवडणूक जाहीरनाम्यात करण्यात आला होता. ज्यामध्ये वीज, पाणी आणि सिंचन देण्याचे आश्वासन दिले होते. यापूर्वी निवडणूक जाहीरनाम्यांवरही प्रश्न उपस्थित करण्यात आले होते; मात्र जेव्हापासून 'व्हिजन डॉक्युमेंट ला नाव देण्याचे काम सुरू झाले आहे, तेव्हापासून त्या प्रश्नांपासून दूर जाण्याचा राजकीय पक्षांचा हा प्रयत्न आहे. त्यांच्या राजकीय विचारसरणीचाही तो दस्तावेज आहे.

भाजपच्या जाहीरनाम्यात अनेक मुद्दे आहेत, ज्यावर टीका होऊ शकते आणि केली जात आहे; परंतु यामध्ये समान नागरी संहितेला विरोध केला जाईल आणि विरोधकांकडून सर्वाधिक टीका केली जाईल. काँग्रेसने




आपल्या जाहीरनाम्याला न्याय-पत्र असे नाव दिले आहे. त्यात म्हटले आहे, की जर त्यांचे सरकार सत्तेवर आले, तर ते वैयक्तिक कायदे पुन्हा लागू करतील. भाषा, धर्म, खाद्यपदार्थ इत्यादींबाबत कोणी काहीही बोलले नसले तरी काँग्रेसने सांगितले तर वैयक्तिक कायदाही त्यात येतो. यामध्ये वैयक्तिक कायदा, तिहेरी तलाक आणि काही प्रमाणात शरिया कायद्याचा समावेश आहे. समान नागरी संहिता आल्यास काँग्रेसच्या न्यायिक शक्तीचे थेट उल्लंघन होईल, अशी टीकाही या मुद्द्यावर होऊ शकते. भारतात कलम ३७० हटवण्यात आले, राम मंदिर बांधले गेले; पण हे मुद्दे भाजपच्या सर्वात मोठ्या टीकेचे होते. त्यामुळे भाजपला सतत जातीयवादी आणि समाजविरोधी म्हटले जात होते. राम मंदिर आणि काश्मीरमधून कलम ३७० हटवण्याचे काम दोन टर्ममध्ये झाले आहे. या वेळी भाजपला बहुमत मिळाल्यास समान नागरी संहितेवरही काम होईल; मात्र त्यावर टीका होणार हे निश्चित. सर्वच राजकीय पक्ष बेरोजगारी आणि महागाईला आपला मुद्दा बनवतात. हे पहिल्यांदाच घडत नाही, तर १९५७ च्या निवडणुकीपासून हे घडत आहे. १९५२ मध्ये देशात पहिल्यांदाच निवडणुका झाल्या, तेव्हापासून बेरोजगारी आणि महागाई हे मुद्दे होते, तरीही ते कमी करू शकलेले नाही. तेव्हापासून आजपर्यंत महागाई खूप वाढली आहे. नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून बेरोजगारी संपुष्टात येईल, ही कल्पनाही पूर्ण मिथक आहे. आजपर्यंत बेरोजगारी आणि महागाईवर कोणीही नियंत्रण मिळवू शकले नाही. पंतप्रधान निवास योजनेचा विस्तार आणि ७० वर्षांवरील प्रत्येक व्यक्तीला आयुष्मान कार्ड देण्याचा उल्लेख ठराव पत्रात करण्यात आला आहे, त्यामुळे यावरही टीका होऊ शकते. सरकार दहा वर्षांत आरोग्य सुविधा देऊ शकले नाही, असे टीकाकार म्हणू शकतात आणि आता निवडणुकीत सर्वांना कार्ड देण्याची भाषा करत आहेत. भाजपला जे काही सकारात्मक वाटते, ते विरोधी पक्षांना नकारात्मक वाटू शकते आणि न्यायपत्रिका काँग्रेसला बरोबर वाटत असेल, तर भाजपला ती चुकीची वाटू शकते. त्यामुळे हा एक दृष्टिकोन आहे. आयुष्मान संपूर्ण देशात आणि सर्वांना लागू व्हायला हवी; पण आता ७० पेक्षा जास्त वयोगटातील लोकांना आयुष्मान देण्यात येणार असल्याचे बोलले जात आहे. या जाहीरनाम्यात भाजप सरकारने गेल्या दहा वर्षात काय साध्य केले आणि तिसऱ्यांदा निवडून आल्यास ते देशाला कसे पुढे नेणार यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. आर्थिक दृष्टिकोनातून, हा जाहीरनामा काही महत्त्वाच्या सुधारणांसह यशाच्या पायावर सातत्य किंवा उभारणी दर्शवतो. आज भारताकडे मोठ्या प्रमाणावर परकीय चलनाचा साठा आहे आणि बँकिंग प्रणाली आता गेल्या दशकातील सर्वोत्तम स्थितीत आहे. महामारीच्या काळात भारताचा संयमित आर्थिक प्रतिसाद आणि केंद्रीय बँकेच्या कायदेशीररित्या निर्धारित महागाई लक्ष्याप्रती असलेल्या वचनबद्धतेमुळे गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली आहे. अशाप्रकारे, वाढ आणि विकासासाठी आवश्यक असलेली समष्टी आर्थिक स्थिरता राखण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार करून भाजपने एक चांगले पाऊल उचलले आहे.

सांख्यिकी संस्थांचे बळकटीकरण आणि पंचायती राज संस्थांमध्ये वित्तीय स्वायत्तता वाढवणे ही आणखी दोन महत्त्वाची आश्वासने देण्यात आली आहेत. या दोन्ही वचनबद्धतेमुळे प्रशासन सुधारण्यास मदत होऊ शकते. भारतासारख्या वेगाने वाढणाऱ्या देशात, धोरणात्मक निर्णयांसाठी वेळेवर डेटा असणे महत्त्वाचे आहे. भारताकडे एक मजबूत सांख्यिकी प्रणाली असली, तरी अर्थव्यवस्थेच्या मागणीच्या बदलत्या स्वरूपाशी ताळमेळ राखण्यासाठी त्याची पुनर्रचना करणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, राष्ट्रीय खात्यांचा डेटा खूप उशीरा उपलब्ध होतो आणि बऱ्याचदा मोठ्या आवर्तनांच्या अधीन असतो. याचा परिणाम धोरणनिर्मितीवर होतो आणि व्यवसायांना निर्णय घेणे अधिक कठीण होते. सांख्यिकी प्रणालीमध्ये सुधारणा करण्याचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था स्वतंत्र आणि विश्वासार्ह बनल्या आहेत. डेटा वेळेवर उपलब्ध झाल्यास, निर्णय घेण्याची प्रक्रिया सुधारेल आणि गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होईल. याशिवाय, सत्तेचे पुरेसे विकेंद्रीकरण झालेले नाही ही भारतीय शासन व्यवस्थेवर होणारी टीका योग्य आहे.

# पर्यावरण वाचवाल तरच! सुखाने जगाल!



**मधुकर ए. निलेगावकर**
संपर्क – ९४२१३७५६९१

**गेल्या पाच दशकांपूर्वीपासून पृथ्वीवरील पाणी, उन,वारा यांचे प्रमाण बदलत असल्याचे भारतीय पर्यावरण तज्ज्ञांनी संशोधनाद्वारे पाच दशकांपूर्वीच सांगितले होते. तसेच, प्रत्येक दशकातही याबाबत वारंवार पर्यावरण तज्ञांनी दैनिक वर्तमानपत्रातून लेखमालेद्वारे तसेच, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय परिषदाद्वारे पर्यावरण संतूलन कायम ठेवण्याबाबत, त्याचा -हास न होऊ देण्याबाबत शासकीय पातळीवर व सार्वजनिकरित्या जनजागृती केली आहे.**

दरवर्षीच जागतिकपर्यावरणदिन साजरा केला जातो! पर्यावरण म्हणजे काय! याचा कधी विचार केला आहे का तुम्ही! शतकानुशतके पर्यावरणाचा समतोल व्यवस्थित राहिला आहे. गतशतकापर्यंत पाऊसही नियमित पडत होता. उन,वारा पाऊस यांचे प्रमाण व्यवस्थित होते. मग, आताच का हे प्रमाण बदलले आहे, आणि ते पुर्ववत होण्यासाठी काय केले पाहिजे याचा विचार सर्वांनी केला पाहिजे. आणि त्याप्रमाणे आपले आचरण ठेवले पाहिजे.जंगलातील झाडे माणसाला ऑक्सीजन देतात, जमिनीची धूप थांबवतात. त्यामुळे पृथ्वीवरील तापमान वाढत नाही, शिवाय , जमिनीतील पाण्याचा साठा कायम राहतो.त्यामुळे, पाण्याचा तुटवडा निर्माण होत नाही. वाराही व्यवस्थित वाहतो. मुख्य म्हणजे, पर्यावरण संतुलन कायम राहते.

गेल्या पाच दशकांपूर्वीपासून पृथ्वीवरील पाणी, उन,वारा यांचे प्रमाण बदलत असल्याचे भारतीय पर्यावरण तज्ज्ञांनी संशोधनाद्वारे पाच दशकांपूर्वीच सांगितले होते. तसेच, प्रत्येक दशकातही याबाबत वारंवार पर्यावरण तज्ञांनी दैनिक वर्तमानपत्रातून लेखमालेद्वारे तसेच, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय परिषदाद्वारे पर्यावरण संतूलन कायम ठेवण्याबाबत, त्याचा -हास न होऊ देण्याबाबत शासकीय पातळीवर व सार्वजनिकरित्या जनजागृती केली आहे.

परंतु, त्याचा म्हणावा तसा परिणाम झालेला दिसून येत नाही. शहरा शहरातील लोकसंख्या दरवर्षी अमाप वाढत चाललेली आहे. त्यामुळे, टेकड्या फोडून, मोठमोठे वृक्ष तोडून , राहण्यासाठी बंगले, व फ्लॅट सिस्टीमच्या बिल्डिग बांधण्याचा उद्योग काही लोक करीत आहेत. तसेच , जंगलातील सागवान तसेच, त्यासम खूप मौल्यवान अशी झाडे, मोठे वृक्ष तोडून त्यांचा व्यापार करणारे दूष्ट प्रवृत्तीच्या लोकांमुळेच हजारो एकर जमिनी कोरड्याठाक होत आहेत. त्यामुळे, पृथ्वीच्या भूगर्भातील पाण्याचा साठे नष्ट होत चालले आहेत. त्यामुळे, शहरात व खेड्यात पाण्याची भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. शहरात व खेड्यात लोकांना पिण्याच्या व सांडपाण्याच्या पाण्यासाठी टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागते आहे. त्या टँकरच्या पाण्यावरही मर्यादा येत आहेत. लोकांची मागणी खूप वाढली आहे. परंतु, बोअरने पुरवठा करणारे टँकर साठे कमी झाले आहेत. म्हणून सगळ्या झाडांचे संगोपन व संवर्धन होणे अत्यंत आवश्यक आहे. प्रत्येक झाडाखाली भरपूर पाणी असते. झाडे जमिनीची होणारी धूप थांबवतात. त्यामुळे, पृथ्वीचे तापमान न वाढता ते संतुलित राहते. पण , वरचेवर होणारी जंगलतोड आणि बेसुमार वाढलेल्या वाहनांचे घातक प्रदूषण, तसेच, विविध कंपन्यांच्या धूरकांड्यातून बाहेर पडणा-या काळ्याकुट्ट धुराचे प्रदूषण तसेच, केमिकल्स कंपन्यातून बाहेर सोडल्या जाणाऱ्या केमिकल्सचे विषारी पाणी कित्येकदा नद्यांमध्येसुध्दा मिसळले गेले आहे. त्यामुळे, तेथील मासे मरुन जाऊन नद्या रेताड झाल्या आहेत. याबाबत,अनेक पर्यावरणतज्ञांनी यापूर्वीच अनेक लेखांद्वारे वस्तुस्थिती निदर्शनास आणली आहे. पृथ्वीवरील जल, वायू आणि तापमानात प्रचंड प्रमाणात भिन्नता आली आहे. त्यामुळेच, पर्यावरणाचे संतुलन कमालीचे बदलत चालले आहे. दहा वर्षापूर्वी ३५ सेल्सिअस तापमान होते. पाच वर्षांपूर्वी ते ४० सेल्सिअस झाले. गेल्यावर्षी ४५ सेल्सिअस झाले. ते सन २०२७ मध्ये ५०सेल्सिअस झाले तर कुणालाही आश्चर्य वाटू नये. या परिस्थितीला ही वृक्षतोड फोड करणारी व खूप प्रदूषण वाढवणारी माणसेच कारणीभूत आहेत. पुढच्या पिढीच्या सुरक्षित भवितव्यासाठी यावर मोठ्या प्रमाणात सामाजिक प्रबोधन होणे अत्यंत आवश्यक आहे. अशी अवैध कृत्ये करणा-या लोकांवर कडक कारवाई झालीच पाहिजे. निसर्गाचे व पृथ्वीचे अस्तित्व कायम राहीले पाहिजे. भूगर्भातील हालचालींमुळे समुद्रात व जमिनीवर कमीदाबाचे पट्टे निर्माण होतात. या कारणाने

त्यामुळे, चक्रीवादळ व अतिवृष्टी होते, त्यामुळे, पर्यावरणाचा खूपच -हास होत आहे. पण, याकडे कुणाचेच लक्ष नाही. ही फार गंभीर बाब आहे. याबाबत, पर्यावरणतज्ञांनी अनेकवेळा सोदाहरण नमूद केले आहे. समस्त भारतीय जनतेने आणि जागतिक स्तरावर सर्व देशातील जनतेने आताच पर्यावरण संतुलन व्यवस्थित कायम ठेवले नाहीतर, तर सर्वांच्या पुढच्या पिढ्या त्यांना माफ करणार नाहीत. कारण, शुध्द हवेसाठी हिरवी वनश्री नसेल, पिण्यासाठी शुद्ध पाणी नसेल, आणि जमिन नुसती तप्त झालेली असेल तर पुढील पिढ्या जगू कशा शकतील. याचा उत्तम कार्यात्मक विचार आत्ताच झाला पाहिजे, आणि त्वरेने त्याची अंमलबजावणीसुध्दा झाली पाहिजे. अन्यथा, पुढील पिढ्यांचं भवितव्य अधांतरी राहील. अन्न,पाण्याविना आणि शुध्द हवेविना त्यांना जीवन जगणं महाकठीण असेल.

निसर्गाने सद्भावनेने माणसाला श्रीफळातून शुध्द पाणी उपलब्ध करुन दिले आहे.

देवाची करणी । नारळात पाणी

या म्हणीप्रमाणे ही देवाची देणगी आहे.मुख्य म्हणजे, ते पाणीसुध्दा गोड असते.

याउलट माणसाचं आहे.

" माणसाची करणी । बाटलीत पाणी "

पण, ते बाटलीतील पाणी शुध्द असेल याची खात्री नसते. शिवाय, ते गोड तर अजिबात नसते. अशी ही माणसाची म्हण आहे. आता याच बाटलीच्या पाण्याचा व्यवसाय काही माणसं, कंपन्या करीत आहेत. त्यापासून अमाप पैसा कमवीत आहेत. गरीब माणसांना प्यायला पाणी नाही आणि श्रीमंत लोक पाण्याचा गैरवापर करीत आहेत. अशा वृत्तीच्या माणसांच्या कृत्यांना आळा हा घातलाच पाहिजे. सर्व जणांना पाण्याचे समान वाटप झाले पाहिजे. सन २०२३ आणि आताच्या २०२४मध्ये तर पावसाचा कालावधीच पुर्णपणे बदलून गेला आहे. हिवाळ्यात आणि कडक उन्हाळ्यातही कुठे मुसळधार पाऊस पडत आहे

तर कुठे गारपीट होत आहे. तीही प्रचंड प्रमाणात गारपीट होते आहे. ऋतूंमध्ये एवढा बदल होईल याचा स्वप्नातही कुणी विचार केला

नसेल. ते आजच्या काळातील माणसं प्रत्यक्ष अनुभवत आहेत. याला महाभयंकर प्रदूषण करणारी माणसंच जबाबदार आहेत. यासाठी मोठ्या प्रमाणात शासन स्तरावर व सामाजिक स्तरावर सामाजिक प्रबोधन होणे अत्यंत आवश्यक आहे. पर्यावरण संतुलन राहील तरच, मानवाचं अस्तित्व कायम राहील हे त्रिकालाबाधित सत्य आहे. पर्यावरणाचा श्वास म्हणजे माणसाचा श्वास आहे. हे विश्वातील सर्व माणसांनी अत्यंत गांभीर्याने लक्षात घेतले पाहिजे.परवा एका व्याख्यात्याचं पर्यावरणावर छान व्याख्यान झालं. त्यात त्यांनीही जल,वायू, हवा आणि झाडे यांचं विनाप्रदुषण संतुलन कायम ठेवल पाहीजे असं सांगितलं. सध्याच्या परिस्थितीत चीनमध्ये तिथे कांही भागांमध्ये तर शुध्द हवाच मिळत नाही. तर त्या लोकांना बाटल्यांतून हवा विकत घ्यावी लागते म्हणे! अशी परिस्थिती भारतात येऊ द्यायची नसेल तर वेळीच सर्व भारतीयांनी सजग होऊन सर्व प्रकारचे प्रदूषण त्वरीत थांबवून पुर्ण भारतदेश प्रदूषणमुक्त केला पाहिजे. तरच , सर्वांच्या भावी पिढ्या सर्वांना धन्यवाद देतील.

पर्यावरणाबाबत काही स्वलिखित चारोळ्यां मी , खाली सादर करीत आहे.

एक

पर्यावरणाच्या श्वासावर बोलू काही
अहो! कोणी म्हणेल हे काय काही बाही
खरच! यात खोटे असे काहीच नाही
पर्यावरणाचा श्वास म्हणजे,तुमचा श्वास
ओळखाल, तरच, सुखाने जगाल झकास!

दोन

पाऊस माझा प्राणसखा
म्हणतो जगी बळीराजा
महत्व पर्यावरणाचे ओळखा
नाहीतर, भोगा दुष्काळाची सजा

तीन

स्वत: हसा अन् इतरांना हसवा
जीवनात आनंदाचे भागीदार व्हा
पर्यावरणाच्या सहस्र सहस्रकात
जीवनी हासत खेळत शतायुषी व्हा!

चार

पाणी आणि वृक्ष आहेत तुमचे प्राण
करु नका हो! तुम्ही त्यांना असं निष्प्राण
आहेत तेच तुमच्या जीवनाची शान
तेच आहेत तुमच्या जीवनाचे निशाण.

***

# हनुमान जन्मोत्सवानिमित्त भाविकांची गर्दी

## जय श्रीराम... जय श्री हनुमानाचा जयघोष

अहमदनगर : अहमदनगर शहरात हनुमान जयंती आज मोठ्या उत्सहात व भक्तिपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. शहरातील सर्वच भागांमधील मंदिरात सकाळपासून भाविकांनी गर्दी केली होती.

अयोध्येत श्रीराम मंदिराच्या उभारणीमुळे श्रीराम नवमी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली होती. आज रामभक्त हनुमानाचाही जन्मोत्सव नगर शहरात मोठ्या उत्साहात व भक्तीपूर्ण वातावरणात साजरा झाला. शहरातील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या सर्जेपुरा येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिरात आज सूर्यदयावेळी हनुमान जयंती भक्तिभावाने साजरी झाली. त्यानिमित्त आज पहाटे हनुमानाच्या मूर्तीला महाभिषेक व विधिवत पुजा करून हनुमान चालीसा पाठ, श्रीराम नामाचा जप व आरती करून हनुमंताच जन्मोत्सव साजरा करण्यात आला. बरोबर सुर्यदयाच्या वेळी उपस्थित शेकडो भाविकांनी जय श्रीराम... जय श्री हनुमान... असा जयजयकार करत पाळणा हलवून हनुमानाचा जन्मोत्सव साजरा केला. श्री हनुमान जयंतीनिमित्त येथील मंदिरामध्ये पहाटेपासूनच भाविकांची दर्शनासाठी लगबग सुरू होती. त्यानिमित्त मंदिरात अंतर्गत सजावट व मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. स्पीकरवर हनुमान चालीसा पाठ व भक्तिगीते लावण्यात आली. हनुमान जयंती निमित्त सर्जापुरा येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिराचे पुजारी कन्हैय्यालाल परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला, अशी माहिती प्रवीण परदेशी यांनी दिली.



अहमदनगर : सर्जेपुरा येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिरात आज पहाटे भक्तिपूर्ण वातावरणात हनुमान जयंती साजरी करण्यात आली. त्या वेळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. (छायाचित्र :सिद्धार्थ दिक्षित)

## पान १ वरून...

### मतदानासाठी खासगी...

आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. सुट्टी उदयोग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत येणाऱ्या आस्थापना, कारखाने, दुकानांना लागू राहिल. त्यासह खासगी कंपन्यांमधील आस्थापना सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खादयगृहे, अन्य् गृहे, नाटयगृहे, शॉपींग सेंटर मॉल्स् यांनाही हा नियम करण्यात आला आहे. अपवादात्मक परिस्थितीत ज्या ठिकाणी कामगार, अधिकारी व कर्मचाऱ्यांना सुट्ट देणे शक्य नसेल तिथे मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुटटी ऐवजी दोन ते तीन तासांची सुटटी, अथवा कामावर उशिरा येण्याची किंवा लवकर जाण्याची परवानगी देण्यात यावी, असेही स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. याबाबत त्यांनी संबधित महापालिका आयुक्त अथवा जिल्हाधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

### कर्जतला खून करुन...

दरम्यान या प्रकरणी पोलिसांनी तलाश उर्फ तुषार शिवा काळे व गौरी तलाश उर्फ तुषार काळे यांना अटक केली असून, अश्विनी शिवा काळे ही पसार आहे. या तीनही आरोपींविरोधात कर्जत पोलीस स्टेशनला खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तुषार शिवा काळे व गौरी तुषार काळे यांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

### प्रचार साहित्यावर मुद्रक...

कोणत्याही व्यक्तीला निवडणूक पत्रिका, भित्तीपत्रके, होल्डींग्स, फ्लेक्स बोर्ड तो स्वतःच त्याचा प्रकाशक आहे. याबद्दल स्वतः स्वाक्षरित केलेले आणि ज्या व्यक्ती तिला व्यक्तिशः ओळखतात अशा दोन व्यक्तींनी साक्षांकित केलेले अधिकथन त्याने मुद्रकाला दोन प्रतीमध्ये दयावेत. दस्तऐवज मुद्रित झाल्यानंतर वाजवी मुदतीच्या आत, मुद्रक व प्रकाशकाने त्या दस्ताएवजाची एका प्रतीसह प्रकाशकाच्या अधिकथनाची एक प्रत राज्याच्या राजधानीच्या ठिकाणी मुद्रित झाला असेल तर, मुख्य निर्वाचन अधिकाऱ्याला किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी मुद्रीत झाली असेल तर त्या जिल्ह्याच्या जिल्हा दंडाधिकाऱ्याला पाठविल्याशिवाय मुद्रीत करता येणार नाही किंवा मुद्रीत करता येणार नाहीत.

### थकीत कर्जदार दोन...

धनादेश संस्थेच्या वसुली पथकास दिला होता. हा धनादेश वटेल, अशी खात्री आरोपीने संस्थेला दिली होती. हा धनादेश संस्थेने त्यांच्या खाते असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्र शाखा अहमदनगर येथे बँकेत भरला. मात्र, धनादेश खात्यात पुरेशी रक्कम शिल्लक नसल्याने कारणास्तव परत आला. त्यामुळे फिर्यादी संस्थेने ॲड. आण्णा दशरथ वाळके यांच्यामार्फत अहमदनगर येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,कोर्ट नंबर १४ याचेकडे आरोपी विरुध्द निगोशियल इन्स्टुमेट ॲक्ट चे कलम १३८ नुसार केस दाखल केली. फिर्यादीची गुणदोषावर चौकशी होऊन आरोपीस धनादेश न वटल्याबाबत प्रकरणी अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी ए. ए. जी. एम शेख यांनी दोन महिने साधारण कारावासाची शिक्षा तसेच द्रव्यदंड रक्कम रूपये २ लाख भरण्याची शिक्षा ठोठावण्यात आलेली आहे. जर द्रव्य दंडाची रक्कम भरण्यास कसुर केल्यास आरोपीस सहा महिन्याची साधारण कावासाची शिक्षा सुनावण्यात आलेली आहे.

### बारामतीत सुप्रिया सुळे...

त्यामुळे मराठी नावातील तुतारी हा शब्द बदलून त्या ठिकाणी दुसरा शब्द निवडणूक आयोगाकडून देण्यात यावा, अशी विनंती या पत्रात करण्यात आली आहे

### कत्तलीसाठी चालवलेल्या...

स्विफ्ट कार व आवाईज कुरेशी हा त्यांचेकडील १ पिकअप मधुन जेऊर (ता. नगर) येथुन संभाजीनगरकडे गोमांस व जिवंत जनावरे कत्तल करण्यासाठी घेवून जाणार आहे, अशी माहिती मिळाल्याने पथकाने जेऊर गांवात कोल्हुबाईचे कोल्हारकडे जाणारे रोडवर चौकात सापळ लावून थांबले. थोड्याच वेळात जेऊर गावाकडून पथकाचे दिशेने संशयीत वाहने येताना दिसली. पथकाची खात्री होताच पांढरे रंगाचे स्विफ्ट कार व पिकअप चालकास थांबण्याचा इशारा केला असता दोन्ही चालकांनी वाहने थांबविली. दोन्ही चालकांना त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांची नावे सलमान अजीज शेख (वय २८, रा. घासगल्ली, कोठला मैदान, अहमदनगर) व आवाईज सलीम कुरेशी (वय २०, रा. कुरेशी मोहल्ला, जेऊर, ता. नगर) असे सांगितले.दोन्ही वाहन चालकांचे ताब्यातील वाहनांची पहाणी करता त्यामध्ये गोमांस व गोवंशीय जिवंत जनावरे मिळून आली. त्यांना ताब्यात घेत त्यांच्या कडून १ लाख ८० हजार रुपये किंमतीचे सहाशे किलो वजनाचे गोमास, १ लाख २० हजार रुपये किंमतीची ६ मोठी जिवंत जनावरे, ५ लाख रुपये किंमतीचा १ पिकअप व चार लाख रुपये किंमतीची १ स्विफ्टकार असा एकूण १२ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

### नेवासा बुद्रुकच्या दक्षिणमुखी...

सुमारास दक्षिणमुखी मारुतीच्या मूर्तीस दक्षिणमुखी मारुती मंदिर देवस्थानचे अध्यक्ष गंगाधर शिंदे व विश्वस्त ॲड. वसंतराव नवले यांच्या हस्ते वेदमंत्राच्या जयघोषात अभिषेक घालण्यात आला. वेदशास्त्रसंपन्न आचार्य लालागुरू जोशी यांनी यावेळी झालेल्या धार्मिक कार्यक्रमाचे पौरोहित्य केले. या वेळी झालेल्या हनुमान जन्मोत्सव सोहळयाच्या प्रसंगी ह. भ. प. कोंडीराम महाराज पेचे, रामायणाचार्य ह.भ.प. नंदकिशोर महाराज खरात, ह.भ.प. गहिनीनाथ महाराज आढाव,ह. भ. प विजय महाराज पवार, गणेश महाराज दरंदले, देवस्थानचे अध्यक्ष गंगाधर शिंदे, उपाध्यक्ष किशोर गायकवाड, सचिव ॲड. वसंतराव नवले, विश्वस्त दादासाहेब कोकणे, विश्वस्त भानुदास रेडे, राजेंद्र मारकळी, धनंजय डहाळे, लताबाई बोरकर, शेषराव डौले, संभाजी बेद्रे, सुनील डोहाळे, गोकुळराव जायगुडे, सखाराम महाराज टेलर, केशव डौले, पुंजाराम पेचे, संभाजी ठाणगे, पिंटूभाऊ बोरकर यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी झालेल्या हनुमान जन्मोत्सव सोहळयाच्या प्रसंगी नेवासा बुद्रुक येथील श्री संत गाडगेबाबा भजनी मंडळाने रामनामाचे भजने गाऊन उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले. सियावर रामचंद्र की, पवन सूत हनुमान की जय असा जयघोष व पुष्पवृष्टी करत हनुमंतरायाचा जन्मोत्सव साजरा करण्यात आला. हनुमान जन्मोत्सवाच्या निमित्ताने पहाटेपासून दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. उपस्थित भाविकांना शिरा व लाडू प्रसादाचे वाटप भाविकांच्या वतीने करण्यात आले. देवस्थानचे अध्यक्ष गंगाधर शिंदे यांनी भाविकांचे आभार मानले.

# अतिक्रमण हटविण्याच्या मुद्द्यावर गौरी घुमटला राडा

अहमदनगर : अतिक्रमण काढण्याच्या मुद्द्यावरून शहरातील गौरी घुमट परिसरात दोन गटात लोखंडी गज, वीट व कुऱ्हाडीच्या सहाय्याने हाणामारीची घटना घडली. या हाणामारीत दोघेजण जखमी झाले असून येथील शासकीय रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या प्रकरणी दोन्ही गटांच्या परस्पर विरोधी फिर्यादीवरून कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बबन आढाव यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सुरज नामदे व पौर्णिमा नामदे यांच्या विरोधात तर सुरज नामदे यांच्या फिर्यादीवरून बबन आढाव, आरती आढाव, दिनेश बिटला यांच्याविरोधात कोतवाली पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला.

दैनिक लोकआवाज हे दैनिक मालक, मुद्रक व प्रकाशक विठ्ठल सूर्यभान लांडगे यांनी गणेश आर्ट प्रेस, वाडिया पार्क शॉपिंग कॉम्प्लेक्स, माळीवाडा, ४१४०१२ येथे मुद्रित करून दैनिक लोकआवाज, हॉल क्रमांक २, दुसरा मजला, सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल, टी. व्ही. सेंटर, सावेडी येथे प्रसिद्ध केले. RNI NO. MAHMAR/2008/28036 ✲ संपादक – विठ्ठल सूर्यभान लांडगे. (✲ पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे. अहमदनगर न्यायकक्षेत)
'Lokawaz' Daily publication is owned, printed and publisheb by Vitthal Suryabhan Landage, printed at Ganesh Art press wadia park shopping complex, maliwada, Ahmednagar- 414001 and published at Hall No. 2, Second Floor, Savitribai Fule Commercial Complex, T.V. Center, Savedi. Ahmednagar 414 003. ✲ Editor - Vitthal Suryabhan Landage. RNI NO. MAHMAR/2008/28036

# पालिका अभ्यासिका शुल्कात वाढ

## संतप्त विद्यार्थ्यांचा ग्रंथपाल स्वाती पुरे यांना घेराव, अभ्यासिकेत बसण्यास विद्यार्थ्यांना मज्जाव



श्रीरामपूर : पालिका प्रशासनाने गरीब विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी सुरू केलेल्या अभ्यासिकेचे शुल्क अचानक वाढविले. त्यात ग्रंथपाल स्वाती पुरे यांनी विद्यार्थ्यांची विनंती धूडकावून लावत विद्यार्थ्यांना अभ्यासिकेत बसण्यास मज्जाव केल्याने संतप्त झालेल्या विद्यार्थ्यांनी पुरे यांना नगरपालिकेसमोर घेराव घालत जाब विचारला.

स्व. जंयत ससाणे यांच्या पुढाकारातून शहरातील गरीब विद्यार्थ्यांसाठी अभ्यसिका सुरू करण्यात आली. पालिका प्रशासनाने नाममात्र शुल्क आकारून विद्यार्थ्यांना पुस्तके, वीज, पाणी या सुविधांसह अभ्यासिका उपलब्ध करून देण्याचा ठराव तत्कालिन पदाधिकाऱ्यांनी मंजूर केला. त्यानुसार आतापर्यंत विद्यार्थ्यांकडून २००६ पासून दरमहा ६० रुपये शुल्क आकारले जात होते. मात्र, आता अचानक या शुल्कात तब्बल दीडपट वाढ केली आहे. आता ६० ऐवजी १०० रूपये भरावे लागणार असल्याने विद्यार्थी हवालदिल झाले आहेत. सोमवारी सायंकाळी अभ्यासासाठी विद्यार्थी अभ्यासिकेत गेले असता, पुरे यांनी शुल्क भरल्याशिवाय बसता येणार नसल्याचे सांगितले. सर्वांनी इतके शुल्क सर्वांना भरणे शक्य नसल्याची विनंती केली. मात्र, ती विनंती धुडकावून लावत पुरे यांनी शुल्क न भरलेल्या विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यास मज्जाव केला. संतप्त झालेले विद्यार्थी मोठ्या संख्येने पालिकेत मुख्याधिकाऱ्यांकडे आपली कैफीयत मांडण्यासाठी गेले, मात्र मुख्याधिकाऱ्यांची भेट होऊ शकली नाही. खाली आल्यानंतर सर्वांनी पुरे यांनी घेराव घालीत जाब विचारला. पुरे यांनी त्यांच्या भावना समजावून घेत शांत करण्याऐवजी अजब उत्तरे दिली. शंभर रुपये महिना म्हणजे काही विशेष नाही. बाहेर खासगी अभ्यासिकेत किती फी आहे, जाऊन बघा. मुलं चहा प्यायला गेले, तर किती पैसे खर्च करतात, मग अभ्यासिकेसाठी दिल्याने काय बिघडते? शिवाय पुस्तकांच्या किंमती प्रचंड वाढल्याने आता पालिका प्रशासनास अल्प दर शक्य नसल्याचे पुरे यांनी सांगितले. त्यांची उत्तरे ऐकून विद्यार्थी आणखी संतप्त झाले. त्यावरून सामाजिक कार्यकर्ते सुमित मुथ्था व पुरे यांच्यात शाब्दीक चकमक उडाली. विद्यार्थ्यांशी शांततेत बोला. आवाज वाढवू नका. अधिकाराचा गैरवापर करून अरेरावी करू नका, पालिका नागरिकांच्या भल्यासाठी असते. पैसे कमाविण्यासाठी नाही, असे मुथा यांनी ठणकावले.

### शुल्क कमी करण्यासाठी प्रयत्नशील : आदिक

त्याच वेळी माजी नगराध्यक्षा अनुराधा आदिक याही तेथे आल्या. त्यांनीही पुरे यांना धारेवर धरले. आदिक म्हणाल्या, राजकीय विरोधक असूनही स्व. ससाणे यांनी अभ्यासिकेचा स्तुत्य उपक्रम सुरू केला होता, असे मी मानते. गरीब विद्यार्थी या ठिकाणी शिकतात. त्यांच्यावर होणारा अन्याय खपवून घेतला जाणार नाही. याबाबत प्रांताधिकाऱ्यांना भेटून शुल्क कमी करण्याची मागणी करणार असल्याच्या त्या म्हणाल्या. यावेळी मुख्याधिकाऱ्यांनी फोन लावून संपर्क केला, मात्र ते मिटिंगमध्ये असल्याने बोलणे होऊ शकले नाही.

## संक्षिप्त..

### हनुमानाने समाजाला भक्तीची दिशा शिकवली : जाधव

अहमदनगर : वारकरी संप्रदायाचा व स्वराज्याचा भगवा ध्वज आपण पाहिल्यानंतर आपल्याला नेहमीच ऊर्जा निर्माण होते. आजच्या युवा पिढीला धार्मिकतेचे धडे द्यावेत, श्री हनुमंत रायांनी समाजाला भक्तीची दिशा शिकवली. आई-वडिलांची सेवा ही ईश्वर सेवा असून, ती प्रत्येकाने करावी. धार्मिक कार्यक्रमाच्या माध्यमातून समाज एकवटला जात असून, समाजात एकोपा निर्माण होऊन विचारांची देवाणघेवाण होत असल्याचे प्रतिपादन ह.भ.प. प्रांजलताई जाधव यांनी केले. नालेगाव गाडगीळ पटांगण येथे हनुमान जयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज तरुण मंडळाच्या वतीने ह.भ.प. प्रांजलताई जाधव यांचे कीर्तन झाले. त्यावेळी नालेगाव ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. नालेगाव येथेश्री हनुमान जयंतीनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहात ह.भ.प. प्रांजल जाधव या वारकरी मुलीने वयाच्या अवघ्या १८ वर्षांमध्ये अध्यात्मिक व धार्मिकतेचे धडे घेऊन कीर्तनरुपी सेवा केली. यावेळी श्रोत्यांच्या वतीने या वारकरी मुलीचे कौतुक करीत तिच्या कीर्तनाला साथ दिली.

### अंकुश नन्नवरे यांचे निधन



अहमदनगर : कायनेटिक चौक, रविश रो-हौसिंग सोसायटी येथील रहिवासी प्रगतशिल शेतकरी अंकुश शंकरराव नन्नवरे (वय ८०) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव, अमरधाम स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. स्व.अंकुश नन्नवरे यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते धार्मिक व मनमिळावू स्वभावाचे होते. जि.प. मधील सामान्य प्रशासन विभागातील वरिष्ठ सहा. प्रदीप नन्नवरे व नगर तालुका वाचनालयाचे ग्रंथपाल संदिप नन्नवरे यांचे ते वडिल होत.



श्रीरामपूर येथे भारतीय घटनेचे शिल्पकार, भारतरत्न, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त सिंधी समाजाच्या वतीने श्रीरामपूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्याप्रसंगी समाजाचे रवींद्र गेरेला ,मंगेश छतवाणी संतोष मोकळ आदी उपस्थित होते.

# राहुरी कृषी विद्यापीठात क्रिकेट स्पर्धेला प्रारंभ



अहमदनगर : सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय व कृषी विद्यापीठाच्या (ता. राहुरी) मैदानावर वरिष्ठ वयोगटातील पुरुष व महिला यांच्या राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेला प्रारंभ झाले. टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र यांच्या मान्यतेने व अहमदनगर जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या सहकार्याने ही स्पर्धा होत आहे. राज्यभरातून विविध संघांनी यामध्ये सहभाग नोंदवला आहे. स्पर्धेचे उद्घाटन सावित्रीबाई फुले शिक्षण मंडळाचे सचिव डॉ. महानंदजी माने यांच्या हस्ते झाले. यावेळी टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्राच्या सचिव मीनाक्षी गिरी, सावित्रीबाई फुले प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक बाळासाहेब खेत्री, सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयाचे उपप्राचार्य बाळासाहेब डोंगरे, पर्यवेक्षक मनोज बावा, महेश मिश्रा, संदीप पाटील, टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्राचे खजिनदार धनश्री गिरी, घन:श्याम सानप आदी उपस्थित होते. डॉ. महानंदजी माने म्हणाले की, खेळामुळे आरोग्य उत्तम राहून मानसिक स्वास्थ्य देखील चांगले राहते. खेळाने एकाग्रता वाढत असून, विद्यार्थ्यांनी मैदानी खेळाकडे वळण्याचे त्यांनी आवाहन केले. २२ ते २४ एप्रिलदरम्यान पुरुष व महिलांच्या राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धा रंगणार आहेत. वरिष्ठ गटातील स्पर्धेसाठी राज्यातून सोळा संघ सहभागी झाले असून, मुलींचे ८ संघ सहभागी आहेत. यामध्ये ३०० खेळाडूंनी सहभाग नोंदवला असून, नाशिक, अहमदनगर, सांगली, बीड, हिंगोली, जालना, बुलढाणा, लातूर आदी जिल्ह्यातील संघांचा समावेश आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन घन:श्योम सानप यांनी केले. आभार सोहम गिरी यांनी मानले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी अभिजीत गावडे, शैलेश परदेशी, हितेश बोंबले, संतोष जाधव, हलीम शेख आदी परिश्रम घेत आहेत.

# नेवाशात १५ दिवसांनी नळाला पाणी, पंचायतीला टाळे ठोकण्याचा इशारा



नेवासे फाटा : गेल्या दोन वर्षांपासून पिण्याचे पाणी १० ते १५ दिवसांतून येत असल्याने अनेकदा निवेदन देऊन देखील कोणतीच ठोस उपाययोजना होत नसल्याने आता नगरपंचायत मुख्याधिकाऱ्यास घेराव घालून तोंडाला काळे फासण्यात येईल व नगरपंचायतीस कुलूप लावण्यात येईल, अशा गंभीर इशारा नागरिकांच्या वतीने देण्यात आला आहे.

याबाबत २१ रोजी नेवासे नगरपंचायतीचे प्रशासक असलेले तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. त्यात म्हटले आहे की, ५, ६ व ७ या प्रभागांची लोकसंख्या सुमारे ४ ते ५ हजार असून, आमचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न बिकट झाला आहे. हा प्रश्न लवकरात लवकरात मार्गी लावावा, अन्यथा नगरपंचायत मुख्याधिकाऱ्यांना घेराव घालून तोंडाला काळे फासण्यात येईल, तसेच नगरपंचायतीला कुलूप लावण्यात येईल, याची दखल गांभीर्याने घेऊन पिण्याच्या पाण्याला प्रश्न मार्गी लावावा, असे म्हटले आहे. यावेळी प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संबंधित पाणी योजना विभागाला अनेकदा निवेदने दिली. महिला मंडळींना पाण्याचे योग्य नियोजन नसल्याने मोठ्या समस्येला तोंड द्यावे लागते. लवकरात लवकर हा प्रश्न मार्गी लावावा, अन्यथा नगरपंचायत कार्यालयाला कुलूप लावणार असल्याचे राहुल सूर्यवंशी यांनी सांगितले.

# रिजन कॉन्फरन्समध्ये लायन्स क्लबला सर्वाधिक पारितोषिक




राहाता : लायन्स क्लब, राहाता यांच्यातर्फे रिजन कॉन्फरन्समध्ये क्लबचे संस्थापक, अध्यक्ष दीपकराव दंडवते यांच्या मार्गदर्शनाखाली लायन्स क्लबने सर्वाधिक पारितोषिक पटकावली. २० एप्रिल रोजी अगत्य कृषी पर्यटन येथे झालेल्या रिजन कॉन्फरन्समध्ये क्लबच्या अध्यक्षा अंजलीताई उबाळे यांनी क्लबसाठी केलेल्या भरघोस कामाची पावती पारितोषिक मिळवून पूर्णत्वास आली.

रिजन कॉन्फरन्समध्ये प्रेसिडेंट अंजलीताई उबाळे, सेक्रेटरी अर्चनाताई दंडवते आणि ट्रेझरर डॉ प्रज्ञा गायकवाड यांना माय प्राइड लायन पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. फोटो कॉन्टेक्स्टमध्ये क्लबचे सदस्य सागर सोमवंशी यांनी फोटो प्रेझेंटेशन केले. त्यामुळे क्लबला नंबर एकचे पारितोषिक मिळाले. डॉ. संजय उबाळे यांनी बॅनर प्रेझेंटेशनमध्ये समाजोपयोगी घोषणा देऊन क्लबला तीन नंबरचे पारितोषिक मिळाले. क्लबचे मार्गदर्शक डॉ. संजय उबाळे डिस्ट्रिक्ट चेअर पर्सन कॅन्सर अवरनेस यांनी यावर्षी डिस्ट्रिक्टमध्ये खूप चांगल्या प्रकारचे काम केल्याबद्दल त्यांनी माय प्राइड लायन असा पुरस्कार देऊन डिस्टिक गव्हर्नर यांच्या हस्ते गौरविण्यात आले. गिरीश मालपाणी यांनी क्लबचे संस्थापक दीपकराव दंडवते आणि डॉ. संजय उबाळे यांना इंटरनॅशनल पिन देऊन सन्मान केला. त्यानंतर झालेल्या लकी ड्रॉमध्ये क्लबचे सदस्या लायन सरला तायडे यांनाही बक्षीस मिळाले. अशा प्रकारे रिजन कॉन्फरन्समध्ये सर्वाधिक पारितोषिक घेणारा राहाता क्लब ठरला.

उपाध्यक्ष सदाफळ, सचिन जी मुरादे, रवींद्र धस, डॉ.बापूसाहेब पानगव्हाणे, अनिल सातव, प्रा. बाळासाहेब गाडेकर, गोरख दंडवते, राजाभाऊ बांगर, बबलू फटांगरे, विजयराव धनवटे, रतन चौधरी, स्वप्नील आहेर, ॲगड. दिनेश कारले, राजू पठाण, किरण वाबळे आदी उपस्थित होते.

# शिक्षक, प्राध्यापक देशाचे खरे हिरो : देवळाणकर

## माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे यांना शिक्षणमहर्षी माधवरावजी मुळे जीवनगौरव पुरस्कार



अहमदनगर : समाज घडविणारे शिक्षक, प्राध्यापक हे देशाचे खरे हिरो आहेत. देशाला सामाजिक स्थैर्य व विकासात्मक दिशा देण्याची भूमिका शिक्षण क्षेत्राच्या माध्यमातून होत असते. देश उभारणीसाठी शिक्षण क्षेत्राचे महत्त्वाचे स्थान आहे. बदलत्या काळानुरुप व स्किलच्या युगात नवीन शिक्षण पध्दतीचा सर्वांना अवलंब करावा लागणार असून, विद्यार्थ्यांना ज्ञानाबरोबरच रोजगारक्षम बनवणे हेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे प्रमुख उद्दीष्ट असल्याचे प्रतिपादन उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी केले. स्व. माधवराव दगडूजी मुळे प्रतिष्ठानच्या वतीने शिक्षणमहर्षी माधवरावजी मुळे जीवन गौरव पुरस्कार लखनऊ विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे यांना सपत्निक पाहुण्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी डॉ. देवळाणकर बोलत होते. शहराच्या नगर-पुणे महामार्ग येथील हॉटेल राजयोगच्या सभागृहात जिल्हा परिषद शिक्षण विभागाचे श्रीराम थोरात यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम पार पडला. यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुकेश मुळे, उपाध्यक्ष दत्तापाटील नारळे, सचिव प्राचार्य एम.एम. तांबे, खजिनदार बजरंग पाडळकर आदी उपस्थित होते. पुढे डॉ. देवळाणकर म्हणाले की, शिक्षण क्षेत्रात जीवनगौरव पुरस्कार कमी प्रमाणात दिले जातात. माजी कुलगुरू यांनी शिक्षण क्षेत्रात तब्बल ४० वर्षे दिलेल्या योगदानाबद्दल त्यांना हा सन्मान कौतुकास्पद आहे. नॅक मूल्यांकनसाठी त्यांनी केलेले कार्य दिशादर्शक असून, आज महाराष्ट्र राज्यातील महाविद्यालय नॅक मुल्यांकनात आघाडीवर आहे. शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या यंग टॅलेंटला प्रोत्साहन देण्यासाठी देखील पुरस्कार देण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व कौशल्यक्षम शिक्षणाची गरज निर्माण झाली आहे. मोठ्या संख्येने भारतीय युवक उच्च शिक्षणासाठी परदेशात जात असून, यामुळे मोठ्या प्रमाणात पैसा परदेशात जात आहे. यासाठी आपल्याकडील शिक्षण पध्दतीत गुणात्मक सुधारणा करावी लागणार आहे.

डॉ. सर्जेराव निमसे म्हणाले की, आयुष्यात स्व. माधवराव मुळे (आबा) ही आगळी-वेगळी व्यक्ती भेटली. उद्यमशील व्यक्तिमत्व असल्याने त्यांनी अनेक उद्योग यशस्वी केले. अल्पशिक्षित राहून शिक्षण क्षेत्रात उत्तुंग कार्य उभे केले. कोणावरही मत लादले नाही. सामंजस्यपणा व जवळच्या व्यक्तीचे मनापासून प्रश्नर सोडवायची त्यांची वृत्ती असल्याचे सांगितले. सध्या व्यावसायिक कौशल्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या खूपच कमी आहे. नवीन शैक्षणिक धोरणात २०२५ पर्यंत ५० टक्के विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाचा समावेश राहणार आहे. तर शून्य ते सहा वयोगटातील मुलांचे शिक्षण कसे असावे? व उच्च शिक्षणामधील धोरण यावर त्यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन प्रा. गणेश भगत यांनी केले. आभार लालचंद हराळ यांनी मानले. यावेळी विश्व.स्त महेश मुळे, नीलम काळदाते, लालचंद हराळ, सुनील म्हस्के, प्रा. देवकर आदींसह प्रतिष्ठानचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मंथन परीक्षेत स्वराज लंके नगर जिल्ह्यामध्ये पहिला

निघोज : निघोजचा स्वराज सत्यवान लंके हा श्रीमुलिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा सहावीचा विद्यार्थी नुकत्याच घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय मंथन परीक्षेत राज्यात सातवा, तर नगर जिल्ह्यात पहिला आला. पारनेर तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात त्याचे कौतुक होत आहे.

या विद्यालयातील अनेक विद्यार्थी सातत्याने विविध स्पर्धांमध्ये नावलौकिक मिळवत असतात.त्यामुळे पारनेर तालुक्यात या शाळेचा नावलौकिक उंचावलेला आहे. स्वराज लंके हा श्रीमुलिका देवी विद्यालयात सहावीत शिक्षण घेत असून, विद्यालयात घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये सहभागी होऊन सातत्याने यशस्वी झाला आहे. अत्यंत शांत, अभ्यासू, चिकित्सक व धाडसी विद्यार्थी म्हणून परिचित आहे. त्याचे नगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य अर्जुनराव भुजबळ, उपप्राचार्य के. बी. शिंदे यांनी कौतुक केले.

# साईयोग फाउंडेशनद्वारे महावीर जयंती साजरी



राहाता : साईयोग फाउंडेशन, राहाता व राहाता नगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने रविवारी सकाळी नवनाथ मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. राहाता ग्रामदैवत वीरभद्र महाराज व नवनाथ महाराज यात्रेच्या अगोदर साईयोग फाउंडेशनद्वारे मंदिर परिसरातील केरकचरा साफ करून संपूर्ण परिसर झाडून स्वच्छ करण्यात आला. यावर्षी भगवान महावीर यांच्या जन्मकल्यानक/जयंतीचे औचित्य साधत राहाता नगरपालिकेचे मुख्याधिकारी वैभव लोंढे व श्री वर्धमान जैन श्रावक संघ, राहाताचे संघपती अनिल पिपाडा यांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. सर्व मान्यवरांना श्रीसाई शाल देऊन फाउंडेशनच्या वतीने सन्मानित करण्यात आले. साईयोग फाऊंडेशनचे ज्येष्ठ सदस्य बाळासाहेब गाडेकर यांनी प्रस्तावना करीत सूत्रसंचालन केले. ड. दत्तात्रय धनवटे, रविंद्र धस व प्रविण जैन यांनी मनोगत व्यक्त करताना भगवान महावीर यांच्या अहिंसा परमो धर्म या जीवनशैलीची महानता विषद करीत विश्वशांतीसाठी आज त्यांच्या विचारांचे अनुकरण करण्याची गरज असल्याचे नमूद केले. विलास वाळेकर यांनी सर्वांचे आभार मानले. याप्रसंगी श्री विरभद्र सार्वजनिक देवळे उत्सव ट्रस्टचे अध्यक्ष साहेबराव निधाने, साईयोग फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. बापूसाहेब पानगव्हाणे, योगगुरू सुरेश भिंगारदिवे, श्री वर्धमान जैन श्रावक संघ राहाताचे उपसंघपती नेमिचंद लोढा, सेक्रेटरी प्रवीण जैन, सदस्य सुवालाल मुनावत, श्रावक देवेंद्र मुनावत, ड. गोरखनाथ दंडवते, भाऊसाहेब बनकर, मोहन तांबे, सीताराम बावके, बबलू फटांगरे, अनिल सातव, डॉ. संजय उबाळे, संजय वाघमारे, उमेश लुटे, सुभाष दंडवते, नारायण गाडेकर, शिवाजी पोटे, प्रकाश बेंद्रे, प्रणव लावर, रविंद्र बोठे, विजय आवारे, अशोक साठे, अशोक ताजणे, अनिल कुंभकर्ण, संजय देव्हारे, ज्ञानेश्वर डमाळे, केशव बोठे, कैलास खरात आदी उपस्थित होते. 'वंदे मातरम्' या राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

# पुस्तके आयुष्य आनंदाने फुलवतात : डॉ. शिंदे

अहमदनगर : सोशल मीडियाला कंटाळल्याने लोक पुस्तक वाचनाकडे वळत आहेत. वाचनासाठी खास वेळदेखील काढतात. चांगल्या पुस्तकाची चिकित्सा करतात आपले मत मांडतात. शहरासह गाव खेड्यात देखील वाचन संस्कृती बहरत आहे. हार, फुले, पुष्पगुच्छ कालांतराने सुकून जातात. मात्र त्या ऐवजी पुस्तके दिल्यास ती इतरांचे आयुष्य आनंदाने फुलवून टाकतात. त्यांचे विचार समृद्ध करतात, असे प्रतिपादन स्नेहबंध सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी केले.

जागतिक पुस्तक दिनानिमित्त डॉ. उद्धव शिंदे यांनी भिंगार छावणी परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे यांना पुस्तक भेट दिले. त्यावेळी ते बोलत होते. डॉ. शिंदे म्हणाले, की अवांतर पुस्तक वाचनाकडे वळावे, यासाठी संस्थेच्या, शासनाच्या तसेच दानशूर व्यक्तींच्या माध्यमातून गावागावांत ग्रंथालय उभारण्यात आले आहेत. त्यामुळे गावागावांत वाचनसंस्कृती वृद्धिंगत होत आहे. ही बाब निश्चित स्वागतार्ह आहे. त्यातून समाज अधिक सजग व प्रगतिशील होण्यास गती मिळेल. जसा वेळ मिळेल, तसे वाचत राहिले पाहिजे. वाचनसंस्कृती टिकावी, ज्ञानाची कवाडे आणखी विस्तारावीत व सर्वांपर्यंत पुस्तके सहज पोहोचावीत, यासाठी वाढदिवस, समारंभ, कार्यक्रम आदी ठिकाणी फुल, पुष्पगुच्छ याऐवजी पुस्तके भेट देण्याचे प्रमाण वाढताना दिसत आहे. पुस्तके वाचली पाहिजेत. जसा वेळ मिळेल तसे वाचत राहिले पाहिजे, असे छावणी परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे म्हणाले.



॥ लोकशाहीचा ॥
लोकआवाज
अहमदनगर, बुधवार दि.२४ एप्रिल २०२४ । पान ६



# 'तनपुरे'चे कार्यकर्ते विखेंच्या प्रचारात सक्रीय

## जिल्हा बँकेचे अध्यक्ष कर्डिले यांची माहिती; कारखानास्थळावर संवाद मेळावा

राहुरी : डॉ. तनपुरे सहकारी साखर कारखाना कामगार युनियनचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी महायुतीचे नगर लोकसभा मतदारसंघाचे

उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील यांना जाहीर पाठिंबा दिला असून, कामगार कार्यकर्त्यांनीच विखे यांच्या प्रचाराची धुरा स्वीकारली असल्याची माहिती अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष शिवाजीराव कर्डिले यांनी दिली.



डॉ. तनपुरे सहकारी साखर कारखान्यात आपण कधीच पक्षीय राजकारण आणले नाही. कारखान्याच्या कामगारांचे प्रश्न सोडविण्यास नेहमीच प्राधान्य दिले. आताही भविष्यात याच कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्राधान्य दिले जाईल, असे आश्वासन कर्डिले यांनी कामगारांना संवाद मेळाव्यात दिले. त्यानंतर सर्वच कामगारांनी खा. डॉ. सुजय विखे पाटील यांना पाठिंबा असल्याचे जाहीर केले, अशी माहिती कर्डिले यांनी दिली.

विखे पाटील यांच्या प्रचारार्थ डॉ. तनपुरे सहकारी साखर कारखाना कामगारांचा मेळावा राहुरी येथे जिल्हा बँकेचे अध्यक्ष तथा माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. त्या वेळी त्यांनी ही घोषणा केल्याचे कर्डिले म्हणाले.

साखर कामगार युनियनचे अध्यक्ष गजानन निमसे, उपाध्यक्ष अर्जुन दुशिग, सचिव सचिन काळे, जिल्हा उपाध्यक्ष अमोल भनगडे, संचालक रवींद्र म्हसे, कामगार नेते कारभारी खुळे, सुरेश थोरात, नगरसेवक विक्रम भुजाडी यांच्यासह कामगार युनियनचे अन्य सदस्य यावेळी उपस्थित होते.

कर्डिले म्हणाले, जिल्हा बँकेच्या माध्यमातून नेहमीच कारखान्याला मदत व सहकार्य करण्याची भूमिका घेतली. कै. रामदास पाटील धुमाळ यांच्या काळात देखील बँकेची मदत मिळवून दिली होती. संस्था टिकली पाहिजे, कामधेनू जगली पाहिजे. ऊस उत्पादक सभासद व कामगारांना न्याय मिळाला पाहिजे हीच आमची भूमिका कालही होती, उद्याही असेल, असे ते म्हणाले.

दरम्यान, कारखाना बंद कसा पडला. नंतर सुरू कोणी केला, याचा विचार सर्वांनीच केला पाहिजे. काही दिवसांपूर्वी कामगारांनी पत्रकार परिषदेत आपल्या प्रश्नासाठी भूमिका घेतली. त्यामध्ये खा. डॉ. सुजय विखे पाटील व आम्हाला काही चूक वाटत नाही. चार वेळा बँकेच्या माध्यमातून निविदा प्रक्रिया राबविण्याचे काम झाले. परंतु त्यामध्ये कामगारांना दुर्लक्षित करून चालणार नाही, अशी अट घातली होती, अशी माहितीही कर्डिले यांनी कामगारांना यावेळी दिली.

या मेळाव्याचे प्रास्तविक युनियनचे सचिव सचिन काळे यांनी केले. कारखान्याचे कामगार कारखाना गेटच्या आतमध्ये कोणतेही राजकारण करत नाहीत. मागील निवडणुकीत आम्ही सर्व कामगारांनी एकमताने खा. डॉ. सुजय विखे पाटील यांचा गावोगावी जाऊन प्रचार केला होता. आम्हाला राजकारण करायचे नाही. आमची रोजी रोटी महत्वाची आहे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

## उत्कर्षा रुपवते यांचा आज उमेदवारी अर्ज

संगमनेर : वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार उत्कर्षा रूपवते या आज बुधवार दि. २४ एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. यावेळी त्यांचे समर्थक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. सोशल मीडिया वरून जनतेला आवाहन करताना उत्कर्षा रूपवते यांनी असे म्हटले आहे की, आजवरच्या प्रवासात मायबाप जनता माझ्या पाठीमागे मोठ्या संख्येने उभी राहिली आहे.माझे मनोधैर्य आणि पाठबळ वाढवत आहात. आज माझ्या आयुष्यातला मोठा दिवस आहे.या दिवशी आपण सगळेजण माझ्यासोबत असावेत अशी माझी इच्छा असल्याचे उत्कर्षा रूपवते यांनी म्हटले असून मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन त्यांनी केले आहे

## बजरंग गोटा उचलण्याची स्पर्धा उत्साहात



शिर्डी : शहरात क्रांती युवक मंडळ आयोजित हनुमान जन्मोत्सव उत्सव समितीच्या माध्यमातून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दक्षिणमुखी हनुमान मंदीरात हनुमान जन्मोत्सव निमित्ताने बजरंग बोटा उचलणे स्पर्धा, हनुमान याग महाआरती व महाप्रसाद वाटप आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात तरुणांचे आकर्षण म्हणजे १२५ किलो वजनाचा बजरंग गोटा उचलण्याची स्पर्धा. या स्पर्धेचे उद्घाटन सोसायटीचे चेअरमन विलास कोते, दीपक वारुळे, अर्जुन जगताप, मधुकर कोते, किशोर गंगवाल, दत्तू गोंदकर, विजय गोंदकर, रमेश वाघचौरे, आदी मान्यवरांच्या हस्ते बजरंग गोट्याचे विधिवत पूजन करण्यात आले. शिर्डी शहरातील तरुणांनी मोठ्या संख्येने सदर स्पर्धेत भाग नोंदवत हनुमान जयंती निमित्त शक्तीची उपासना केली

१२५ किलोचा बजरंग गोटा उचलण्याच्या स्पर्धेत ५० तरुणांनी सहभाग नोंदविला व २० तरुणांनी हा गोटा यशस्वीरित्या उचलला. यामध्ये सचिन तांबे, प्रशांत गोंदकर, सुरेश सुपेकर, राजेंद्र पांचाळ, समाधान बनकर, सोपान त्रिभुवन, सागर बेलदार, सुदर्शन वेरणेकर, अमोल रोकडे, यश चित्ते, अभिजीत बनकर आदींनी सहभाग घेतला.

या सर्व यशस्वी स्पर्धकांचा सत्कार भाजपा अध्यक्ष सचिन शिंदे, विश्व हिंदू परिषदेचे सुरेंद्र महाले, युवा मोर्चाचे चेतन कोते, तानाजी गोंदकर,मणिलाल पटेल, दीपक रमेश गोंदकर यांनी केला. तसेच हनुमान यागाचे आयोजन करण्यात आले होते. सदर याग करण्यासाठी विजय गोंदकर, किशोर कोठारी, वीरेश जयस्वाल, यांनी विशेष परिश्रम घेतले. क्रांती युवक मंडळाच्या माध्यमातून तरुणांच्या निर्व्यसनाचे प्रतीक असलेल्या चांदीच्या गदेचे पूजन हनुमान मंदिरात करण्यात आले.

## भाजप तालुका उपाध्यक्षपदी माने; आल्पसंख्यांक सेल अध्यक्षपदी मोमीन

निघोज : भाजपाच्या पारनेर तालुका उपाध्यक्षपदी अळकुटी येथील ज्येष्ठ कार्यकर्ते अतुल बापूसाहेब माने यांची तर अल्पसंख्यांक सेलच्या तालुकाध्यक्षपदी असिफ मुनीरखां मोमीन यांची निवड करण्यात आली असून त्यांना निवडीचे पत्र खा. सुजय विखे यांच्या हस्ते देण्यात आले .

यावेळी माने यावेळी म्हणाले की,,१९९८ पासून पुण्यामध्ये व्यवसाया निमित्त असताना भारतीय जनता पार्टीचा सक्रिय कार्यकर्ता म्हणून सक्रिय काम करू लागलो. नंतर भोसरी विधानसभा मतदार संघामध्ये बूथ प्रमुख पक्षाने जबाबदारी दिली. २००८ ते १७ पर्यंत आ. महेश लांडगे व एकनाथ पवार यांच्या नेतृत्वाखाली प्रभाग अध्यक्ष म्हणून काम पाहिले.

२०२० पासून पारनेर तालुक्यात भारतीय जनता पार्टीचे राज्य कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे यांच्या खाली काम करण्यास सुरुवात केली .अळकुटी परिसरामध्ये भारतीय जनता पार्टी व विश्वनाथ कोरडे यांच्या माध्यमातून अनेक विकास कामे केली व चालू आहेत. तालुका अध्यक्ष राहुल शिंदे पाटील व विश्वनाथ कोरडे यांनी माझ्यावर विश्वास ठेवून मला पारनेर तालुका भारतीय जनता पार्टीच्या उपाध्यक्षपदी काम करण्याची संधी दिली व खा. सुजय विखे यांच्या हस्ते पत्र देण्यात आले. मी पुणे पिंपरी चिंचवड येथे पक्ष वाढीसाठी व बळकटीसाठी जे कसून काम केले त्यापेक्षाही जास्त पारनेर तालुक्यात पक्ष वाढीसाठी बळकटीने काम करेल ही ग्वाही देत आहे.

पारनेर तालुका भाजपा च्या अल्पसंख्यांक आघाडी च्या अध्यक्षपदी असिफ मुनीरखां मोमीन यांची निवड करण्यात आली. यावेळी खा. विखे, राज्य कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे, तालुकाध्यक्ष राहूल शिंदे, जिल्हा परिषदेचे माजी सभापती काशिनाथ दाते, जिल्हा कार्यकारिणी सदस्य किसनराव शिंदे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

# भिंगारच्या विकासाला विखे यांच्यामुळे चालना

## महेश नामदे; महायुतीच्या पदाधिकाऱ्यांची शक्तीप्रदर्शन करत प्रचारफेरी

अहमदनगर : खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी लक्ष दिल्यानेचे भिंगारच्या विकासाला चालना मिळाली आहे. अनेक नागरी समस्यांनी ग्रासलेल्या या भागात विखे पाटील यांच्यामुळे भरिव विकासनिधी मिळाल्याने कामे सुरु झाली. त्यामुळे पुन्हा एकदा विखे पाटील यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करावे लागेल, अशी भूमिका भाजपचे शहर-जिल्हा सरचिटणीस महेश नामदे यांनी व्यक्त केली.

विखे पाटील यांनी केंद्राकडे भिंगार शहराच्या समस्या मांडल्या. त्या समस्यांचा सातत्याने पाठपुरावा केला. त्यामुळे छावणी हद्दीतील चटईक्षेत्र वाढले. भिंगारचा पाणीप्रश्न सोडविण्यासाठी विखेंनी प्रयत्न केला. तसेच विकासाच्या दृष्टीने भिंगार शहराचा समावेश नगर महापालिका हद्दीत होण्यासाठी ते प्रयत्नशील आहेत. येथील विकास कामांसाठी त्यांनी तब्बल दोन कोटी रुपये मंजूर करून आणले. त्यामुळे पुन्हा एकदा सुजयपर्व चालवावे लागणार आहे, अशी भूमिका नामदे यांनी मांडली.

भारतीय जनता पार्टी, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महायुतीचे उमेदवार सुजय विखे पाटील यांच्या प्रचारार्थ शक्तिप्रदर्शन करत भिंगारमध्ये प्रचारफेरी काढण्यात आली. त्या वेळी नामदे यांनी खा. सुजय विखेंनी भिंगारसाठी केलेल्या कामांची माहिती दिली.

भिंगार वेशीजवळील हनुमान मंदिरापासून निघालेल्या प्रचारफेरीत भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर, ज्येष्ठ नेते वसंत लोढा, पक्षाचे अहमदनगर विधानसभा प्रमुख महेंद्र गंधे, शिवसेना जिल्हाप्रमुख बाबुशेठ टायरवाले, जिल्हा संपर्कप्रमुख सचिन जाधव, शिवसेना जिल्हाध्यक्ष अनिल शिंदे, शिवसेना शहराप्रमुख दिलीप सातपुते, भिंगार भाजप मंडल अध्यक्ष श्याम बोळे, उपाध्यक्ष संजय पांढरे, शहर शिवसेना प्रमुख सुनील लालबोंद्र, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवम भंडारी यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते प्रचार फेरीत सहभागी झाले होते.

ॲड. आगरकर यांनीही यावेळी महायुतीचे उमेदवार विखे पाटील यांच्या प्रचारार्थ भूमिका मांडली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केवळ दहाच

वर्षाच्या काळात देशाला महासत्तेच्या दिशेने नेले. खा. सुजय विखे यांनीही मतदार संघात कोट्यावधी रुपयांची विकासकामे मार्गी लावली. नगर जिल्ह्यास प्रगतीकडे नेण्याचे कार्य केले आहे. त्यामुळेआगामी निवडणुकीत पुन्हा त्यांनाच संधी द्यावी लागेल, अशी भूमिका मांडली.

सरचिटणीस प्रशांत मुथा, रवींद्र बाकलिवाल, पंडित वाघमारे, प्रकाश रासकर, सोनू गोहेर, अनिल सबलोक, प्रकाश लुणीया, माजी नगरसेवक रवींद्र लालबोंद्रे, शुभांगी साठे, संजय छजलानी, राहुल जामगावकर, महेश झोडगे, दामोदर माखिजा, मयूर बोचुघोळ, महिला जिल्हाध्यक्ष प्रिया जानवे, प्रजोत लूनिया कालिंदी केसकर सविता कोटा, कुसुम शेलार, रवि फल्ले, निलेश साठे, अनिरुद्ध देशमुख, चेतन वजगडेकर, गणेश साठे, राजेंद्र फुलारे, तुषार पोटे, बाळासाहेब भुजबळ, लक्षिकांत तिवारी, अनंत रासने, बंटी डापसे, बाळकृष्ण झांबरे, प्रदीप नामदे, रुपेश फल्ले, संग्राम म्हस्के, बाळासाहेब खताडे, संतोष हजारे आदी उपस्थित होते.

## टाकळीभानला हनुमान जन्मोत्सव

टाकळीभान : श्रीरामपूर तालूक्यातील टाकळीभान येथील ग्रामदैवत श्री. हनुमान मंदिरात श्री. हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्त सोमवार (दि.२२) रात्रभर भजन करण्यात आले. मंगळवार (दि.२३) श्री. हनुमान यांच्या मूर्तीस गंगाजलाने स्नान घालून अभिषेक करण्यात आला व श्रीराम जोशी यांनी विधीवत पूजा केली. ६.१५ वाजता श्री. हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात आला

# जनतेने ठरविल्याने पुन्हा भाजपचेच सरकार येईल : डॉ. विखे पाटील

श्रीगोंदा : देशात मागील दहा वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेली विकासाची कामे पाहून देशातील नागरकांनीच पुन्हा मोदी यांना पसंती दिली आहे. त्यामुळे देशात पुन्हा भाजपचेच सरकार येईल, अशी अपेक्षा महायुतीचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केली. देशात आत्तापर्यंत मोदी सरकारच्या काळात जेवढी विकासाची कामे झाली. तेवढी विकासाची कामे याआधी कोणत्याही सरकारच्या काळात झाली नाहीत, अशी भूमिकाही विखे पाटील यांनी व्यक्त केली.

पेडगाव (ता. श्रींगोंदा) येथे महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आलेल्या संवाद मेळाव्यात ते बोलत होते. प्रताप पाचपुते, अण्णासाहेब शेलार यांच्यासह स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विखे पाटील म्हणाले, वर्षानुवर्षे सत्ता भोगूनही ज्यांना देशासाठी काहीच करता आले नाही. ते टिका करण्याचा प्रयत्न करतात. त्याऐवजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अवघ्या दहाच वर्षांत त्यापेक्षा जास्त विकासाची कामे करुन दाखविली.

देशातील शेतकरी, महिला, व्यापारी, तरुणांसाठी मोदी सरकारने भरीव काम केले आहे. त्यामुळे ३० कोटींहून अधिक लोक गरिबीमुक्त झाले. त्यामुळे देशाने मोदींनाच प्रंसती देत दोन वेळा देशाची सेवा करण्याची संधी दिली. आता तिसऱ्यांदादेखील देशसेवेसाठी त्यांनीच निवड देशातील जनतेने केली आहे, असा विश्वास विखे पाटील यांनी व्यक्त केले.



आगामी २०४७ पर्यंत भारत महासत्ता बनविण्याचे व्हिजन केवळ पंतप्रधान नरेंद्र मोंदी यांच्याकडेच आहे. त्यांनी मागील दहा वर्षांत विकासकामांचे ट्रेलर दाखविले आहे. त्यावर अजून पूर्ण पिच्चर बाकी आहे. त्यामुळे मोदींचे हात बळकट करण्यासाठी लोकांनी जास्तीतजास्त मतदान करावे, असे आवाहन विखे पाटील यांनी केले.

# कोणत्याही घराची श्रीमंती घरातील पुस्तकांवरुनच ठरवावी

## प्रसिध्द साहित्यिक डॉ. संजय कळमकर; समर्थ विदया मंदिरच्या प्रज्ञावंतांचा गौरव सोहळा

अहमदनगर : सध्याच्या युगात घराघरात मोबाईलचा वापर वाढला आहे. मोबाईल, टिव्ही तंत्रज्ञानाच्या आभासी जगातसमाजातूनसंवेदनशीलता लुप्त पावत चालल्या आहेत. म्हणूनच त्याऐवजी घरात गोष्टीची पुस्तके असतील तर लहान मुलं गोष्टींच्या दुनियेत रमतील. मुलांना यशाची सवय लावली तर मुले भविष्यात यशस्वी होतील. मुलांमध्ये फक्त प्रज्ञेचा विकास करण्याबरोबरच प्रतिभेचा विकास आवश्यक आहे. म्हणूनच घरात पुस्तके असावीत. ती पुस्तकेच घराची श्रीमंती ठरवतील, अशी भावना प्रसिद्ध साहित्यिक डॉ. संजय कळमकर यांनी व्यक्त केली.

सावेडीतील श्री समर्थ विदया मंदिर शाळेतील प्रज्ञावंताचा कौतुक सोहळयाचे प्रमुख अतिथी म्हणून प्रसिध्द साहित्यिक डॉ. कळमकर हे बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव तथा शाळा समितीचे चेअरमन सुरेश क्षीरसागर होते. समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष भा. ल. जोशी, उपाध्यक्ष दीपक ओहोळ, शाळा सचिव प्र. स. ओहोळ, सचिन क्षीरसागर, स्वप्नील कुलकर्णी, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग शालेय समिती चेअरमन ॲड. किशोर देशपांडे, अहमदनगर प्रेस क्लबचे अध्यक्ष तथा दै. लोकआवाजचे संपादक विठठल लांडगे, मुख्याध्यापक दुर्योधन कासार, मुख्याध्यापिका संगीता जोशी, पर्यवेक्षिका वसुधा जोशी यांच्यासह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. कळमकर म्हणाले, फक्त अभ्यासाच्या मागे लावून मुलांना यंत्रमानव बनवू नका. त्यांची मैदान व पुस्तकांशी मैत्री करवून दया. त्यांच्याशी सुसंवाद घडवून आणा. विदयार्थी प्रत्यक्ष जगात आत्मविश्वासाने वावरतील यासाठी पालकांनीच उत्तम वागावे. मुलांमधील क्षमता जाणून घेउन त्याप्रमाणे त्यांची आवड जोपासू दया, असे ते म्हणाले.

क्षीरसागर म्हणाले, स्पर्धेच्या जगात विदयार्थ्यांनी स्वत:च्या मार्गाची ओळख व्हावी, यासाठी समर्थ प्रशाला नेहमीच प्रयत्नशील आहे. पालक



अहमदनगर : श्री समर्थ विदया मंदिर शाळेतील प्रज्ञापात्रांचा कौतुक सोहळयाप्रसंगी प्रसिध्द साहित्यिक डॉ. संजय कळमकर, सुरेश क्षीरसागर, मंडळाचे अध्यक्ष भा. ल. जोशी, उपाध्यक्ष दीपक ओहोळ, सचिव प्र. स. ओहोळ, सचिन क्षीरसागर, स्वप्नील कुलकर्णी, लोकआवाजचे संपादक विठठल लांडगे, मुख्याध्यापक दुर्योधन कासार, मुख्याध्यापिका संगीता जोशी, पर्यवेक्षिका वसुधा जोशी आदी. (छायाचित्र: उदय जोशी)

कविता दराडे व जीवन महाजन यांनीही मनोगत व्यक्त केले.

मुख्याध्यापक दुर्योधन कासार यांनी प्रास्ताविक केले. मान्यवर परीचय धनश्री गुंफेकर यांनी केला.

सूत्रसंचालन प्राची देशमुख यांनी केले. संपदा नगरकर यांनी आभार मानले.

## यशोधनमध्ये कुक्कुटपालन कार्यशाळा उत्साहात

संगमनेर : आमदार बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर तालुक्याची विकासातून वैभवाकडे वाटचाल सुरू असून अनेक गावांमध्ये शेतीला जोडधंदा म्हणून कुक्कुटपालन व्यवसाय सुरू आहे. हा व्यवसाय कमी कालावधी, कमी भांडवलात चांगला नफा मिळवून देणारा व्यवसाय आहे. यासाठी एकविरा फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या संकल्पनेतून तालुक्यातील महिलांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न झाली.

यशोधन कार्यालयात एकविरा फाऊंडेशनच्या वतीने महिलांसाठी आयोजित कुक्कुटपालन व्यवसाय प्रशिक्षण कार्यक्रम झाला. यावेळी प्रशिक्षक राजेंद्र गोरे, कार्यालयीन अधीक्षक श्रीराम कुऱ्हे, पी.वाय दिघे, अनिल सोमानी, मंगेश सांगळे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना गोरे म्हणाले की, कुक्कुटपालन हा व्यवसाय कमी पाण्यात, कमी खर्चात व कमी कालावधीत चांगले उत्पादन मिळवून देणारा व्यवसाय आहे. आज अनेक लोक या व्यवसायाकडे वळले असून महिला भगिनींनी या व्यवसायाकडे वळले पाहिजे. मांस व अंडी यांना सातत्याने वाढती मागणी असून योग्य नियोजन केल्यास हा व्यवसाय चांगला नफा मिळवून देतो. अहमदनगर जिल्ह्यात तसेच संगमनेर तालुक्यातही अनेक लोक कुक्कुटपालन हा व्यवसाय करीत असून त्यामुळे त्यांच्यासह स्थानिकांना रोजगाराच्या संधी मिळाल्या आहेत.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक यशोधन कार्यालयातील अनिल सोमानी यांनी केले. आभार मंगेश सांगळे यांनी मानले. यावेळी अनेक महिला भगिनी उपस्थित होत्या.